# लहर

२०१६-२०१७




कासेगांव शिक्षण संस्थेचे, स्था.१९६५

## आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज,आष्टा.

ता. वाळवा, जि. सांगली.

'नॅक' पुनर्मूल्यांकन 'बी' ग्रेड



आमदार जयंतरावजी पाटील (साहेब) यांची
महाविद्यालयास सदिच्छा भेट



राज्यस्तरीय शालेय मैदानी हातोडा फेक स्पर्धेमध्ये कु.अंजली माने हिची
निवड झाल्याबद्दल आमदार जयंतरावजी पाटील साहेब यांच्या हस्ते सत्कार
करताना सोबत संग्राम फडतरे व सुनिल माने



लोकनेते राजारामबापू पाटील व साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे
यांच्या जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त
प्रतिमा पुजन करताना प्राचार्य व शिक्षकवृंद



कॉमर्स विभाग आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये
मार्गदर्शन करताना उपविभागीय पोलिस अधिकारी
श्री.संभाजीराव पाटील



लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ
आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस
वितरण करताना प्राचार्य व शिक्षक वृंद



महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये मा.आमदार जयंतरावजी पाटील(साहेब)
यांच्या हस्ते वृक्ष दिनानिमित्त वृक्षारोपण करताना महाविद्यालयाच्या
राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी

कासेगांव एज्युकेशन सोसायटीचे,
संस्थापक व श्रध्दास्थान



## लोकनेते स्व. राजारामबापू पाटील

अंधारातूनी प्रकाशाकडे उघडीत चंदन दारे
जागोजागी तुम्ही निर्मिली ज्ञानाची मंदिरे
बापू तुमची ज्ञानज्योत ही तेवत ठेवू आम्ही
अंधारातूनी प्रकाशाकडे चालत राहू आम्ही

## मार्गदर्शक



**मा.आम.जयंतराव पाटील**

माजी ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य

# आमचे कुशल प्रशासक



मा. श्री. शामराव परशराम पाटील (काका)
अध्यक्ष, कासेगांव शिक्षण संस्था



मा. श्री. बिडेश रामचंद्र ढवळेकर
उपाध्यक्ष, कासेगांव शिक्षण संस्था



मा. प्राचार्य, रामचंद्र ज्ञानदेव सावंत
सचिव,कासेगांव शिक्षण संस्था



प्राचार्य, डॉ. राजेंद्र कुरळपकर
सहसचिव,कासेगांव शिक्षण संस्था



प्राचार्य, डॉ. विलास गणपती काळे
आर्टस अँण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

प्रति,

______________________

______________________

______________________

# ‘लहर’

२०१६ - २०१७

**सप्रेम भेट**


**प्राचार्य डॉ. विलास काळे**
प्रकाशक

**प्रा. डी.जे.दमामे**
संपादक

# भावपूर्ण श्रध्दांजली



या शैक्षणिक  सालात आमच्या महाविद्यालयाचे

हिंदी विभाग प्रमुख

**प्रा.भगवंतसिंह भाऊसाहेब भागवत**

तसेच जे थोर शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, जवान, साहित्यिक, पत्रकार,

कलावंत, शिक्षणतज्ज्ञ,  सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ज्ञ तसेच आपल्या

संस्थेचे सभासद, प्राध्यापक,शिक्षक,प्रशासकीय सेवक वर्ग आणि

त्यांचे कुटुंबीय,विद्यार्थी व हितचिंतक दिवंगत झाले त्यांना  नम्रतापूर्वक

अभिवादन करुन या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली.

कासेगांव शिक्षण संस्थेचे,

# आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा,

ता. वाळवा, जि. सांगली

(०२३४२) २४२०३२,२४२६३२

# लहर

२०१६ - २०१७

✻ संपादक मंडळ ✻

अध्यक्ष

**प्राचार्य डॉ. विलास काळे**

संपादक

**डी.जे.दमामे**

विभागीय संपादक मंडळ

मराठी विभाग............................प्रा.डी.जे.दमामे

हिंदी विभाग ..........................प्रा.विश्वास पाटील

इंग्रजी विभाग........................... प्रा.राजेंद्र कांबळे

अहवाल विभाग ....................... श्री.डी.बी.शिंदे

कासेगांव शिक्षण संस्थेचे,

# आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा,

ता. वाळवा, जि. सांगली

: (०२३४२) २४२०३२,२४२६३२

# लहर

या नियतकालिकाच्या नोंदणी नियमानुसार लहर वार्षिकांकाच्या मालकी विषयीची आणि इतर तपशिलासंबंधीची माहिती तक्ता क्रमांक (नियम ८)

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, आष्टा. |
| प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| मालक | : | कलम १ नुसार |
| प्रकाशक | : | प्राचार्य डॉ.विलास गणपती काळे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | द्वारा : आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली. |
| संपादक | : | प्रा.डी.जे.दमामे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | द्वारा : आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली. |
| मुद्रक | : | आशीर्वाद ऑफसेट प्रिंटर्स, आष्टा, जि. सांगली. |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |

वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे बरोबर आहे असे आम्ही जाहीर करतो.

**प्रा. डी.जे.दमामे** **प्राचार्य डॉ.विलास गणपती काळे**

टीप : या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
(केवळ खासगी वितरणासाठी)

KASEGAON EDUCATION SOCIETY'S

**ARTS & COMMERCE COLLEGE, ASHTA.**

## Vision

We strive to make the students from rural area competent enough in all respects such as educational, rational, social, technological and economical through excellence in academic and value-based education.

## Mission

We are striving to create a human society of rational, patriotic, secular, highly educated students with indomitable spirit, perseverence, dignity of work research attitude, who would be competent to meet the challenges of life in ever changing scenario and contribute in the development of the nation.

## Goals

1. To promote education among students who are socially, economically and educationally underprivileged especially in rural area.
2. To supervise and control the conduct and discipline of the students and to make them self-relient.
3. To create social awareness, patriotism among students.
4. To make the students competent enough to survive in the area of globalization.
5. To create awareness amongst students about significance of research in various fields of life.
6. To provide education without discrimination of gender, caste, creed, region and economic condition.

## कासेगांव एज्युकेशन सोसायटी,कासेगांव.

स्थापना १९४५

### ※ संस्थेच्या बोधचिन्हाचा अर्थ ※

संस्थेचे 'बोधचिन्ह' 'शिक्षणामधून सर्वांगीण सामाजिक उन्नती' व्हावी या 'दूरदृष्टी' चे निदर्शक आहे.

ग्रंथ आणि दीप हे ज्ञान आणि प्रकाशाची प्रतीके आहेत.

चक्र,तराजु, आणि धान्याच्या लोंबी हे संस्थेच्या 'सातत्यपूर्ण सामाजिक प्रगती' या ध्येयाचे निदर्शक आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासाचे प्रतीक म्हणजे चक्र होय. तर तराजू हे संस्थेच्या वाणिज्य विकासाविषयीची आस्था दर्शविते,आणि धान्याच्या लोंबी संस्थेच्या कृषी विकासाविषयीची तळमळ दर्शविते.

'सर्व हि तपसा साध्यम्' हे संस्थेचे बोधवाक्य असून, सर्वार्थाने प्रयत्न केल्यास कांहीही साध्य होवू शकते,असा त्याचा अर्थ आहे.

# कासेगांव शिक्षण संस्था, कासेगांव,

ता. वाळवा, जि. सांगली

स्थापना - १९४५

## संचालक मंडळ

| | |
|---|---|
| मा. श्री. शामराव परशराम पाटील | अध्यक्ष |
| मा. श्री. बिडेश रामचंद्र ढवळेकर | उपाध्यक्ष |
| मा. प्राचार्य श्री. रामचंद्र ज्ञानदेव सावंत | सचिव |
| मा.प्राचार्य डॉ.राजेंद्र मधुकर कुरळपकर | सहसचिव |
| मा. श्री. बाबुराव गणपतराव पाटील | सदस्य |
| मा. श्री. चाँद गणीसाहेब आत्तार | सदस्य |
| मा. सौ. शैलजादेवी जयंतराव पाटील | सदस्या |
| मा. श्री. वसंतराव ज्ञानदेव माने | सदस्य |
| मा. श्री. तय्यबअली आब्बास चौगुले | सदस्य |

कासेगांव शिक्षण संस्थेचे,

# आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा,

ता. वाळवा, जि. सांगली

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | |
|---|---|
| **मा. शामराव परशराम पाटील** (अध्यक्ष, का. शि. सं. कासेगांव) ...................... | अध्यक्ष |
| **मा. प्राचार्य रामचंद्र ज्ञानदेव सावंत** (सचिव, का. शि. सं. कासेगांव) ................ | सदस्य |
| **मा. प्राचार्य डॉ. विलास गणपती काळे** ........................................... | सचिव |
| **मा. दिलीप बाळासाहेब वग्याणी** ................................................. | सदस्य |
| **मा. अशोक रावसाहेब पाटील** ..................................................... | सदस्य |
| **मा. सुनिल आनंदराव माने** ........................................................ | सदस्य |
| **प्रा. डॉ. अरूण भगवान पाटील** ..................................... | शिक्षक प्रतिनिधी |
| **प्रा. डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर** .............................. | शिक्षक प्रतिनिधी |
| **प्रा.विजयालक्ष्मी आनंदराव नियोगी** ........................................... | सदस्या |
| **श्री. प्रमोद दत्तात्रय फार्णे** ................................ | प्रशासकीय सेवक प्रतिनिधी |

कासेगांव शिक्षण संस्थेचे,

# आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा,

ता. वाळवा, जि. सांगली

## स्थायी समिती

मा. प्राचार्य डॉ. विलास गणपती काळे ........................................ अध्यक्ष

प्रा. डी.जे.दमामे ........................................................ सदस्य

प्रा. सुभाष अनंत जानराव ................................................ सदस्य

प्रा.डॉ.प्रमोदकुमार अंकुश ओलेकर ........................................ सदस्य

प्रा.विजयालक्ष्मी आनंदराव नियोगी ........................................ सदस्या

श्री.दत्तात्रय बाबुराव शिंदे (ग्रंथपाल) ................................................ सदस्य

श्री. राहुल विलास सावंत ................................................ सदस्य

श्री.प्रमोद दत्तात्रय फार्णे ................................................ सदस्य

कासेगांव शिक्षण संस्थेचे,

# आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा,

ता. वाळवा, जि. सांगली

: (०२३४२) २४२०३२

## Internal Quality Assurance Cell

## (IQAC)

| | |
|---|---|
| मा. प्राचार्य डॉ. विलास गणपती काळे | अध्यक्ष |
| मा. प्राचार्य रामचंद्र ज्ञानदेव सावंत (सचिव, कासेगांव शिक्षण संस्था) | सदस्य |
| प्रा. राजेंद्र अशोक कांबळे | समन्वयक |
| मा. श्री. बबन पांडुरंग तांबवेकर (दि.५-८-२०१६ पर्यंत) | सदस्य |
| मा. श्री. विजय रंगराव मोरे (नाना) | सदस्य |
| प्रा. विजयालक्ष्मी आनंदराव नियोगी | सदस्या |
| प्रा. डॉ. बाळासाहेब कोंडीबा माने | सदस्य |
| प्रा. डॉ.अरूण भगवान पाटील | सदस्य |
| प्रा. डॉ.राम निंगाप्पा नाईक | सदस्य |
| प्रा. सुभाष अनंत जानराव | सदस्य |
| श्री दत्तात्रय बाबूराव शिंदे (ग्रंथपाल) | सदस्य |
| मा. श्री. प्रमोद दत्तात्रय फार्णे | सदस्य |
| मा. श्री. राहुल विलास सावंत | सदस्य |

कासेगांव शिक्षण संस्थेचे,

# आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा,

ता. वाळवा, जि. सांगली

: (०२३४२) २४२०३२

## - लैंगिक छळ प्रतिबंधक समिती -

| | |
|---|---|
| प्रा.विजयालक्ष्मी आनंदराव नियोगी | अध्यक्षा |
| प्रा.भगवंतसिंह भाऊसाहेब भागवत (दि.३१-१-२०१७ पर्यंत) | सदस्य |
| प्रा.राजाराम आत्माराम पाटील | सदस्य |
| अ‍ॅड. श्री. पंडीत सोपानराव बसुगडे | सदस्य |
| सौ. सुनंदा मोहन गायकवाड ( स्वयंसेवी संघटना प्रतिनिधी) | सदस्या |
| कु. किरण ढोले ( विद्यार्थी प्रतिनिधी) | सदस्या |
| कु. ऋतुजा चौगुले ( विद्यार्थी प्रतिनिधी) | सदस्या |

## - ग्रंथालय समिती -

| | |
|---|---|
| मा. प्राचार्य डॉ. विलास गणपती काळे | अध्यक्ष |
| श्री दत्तात्रय बाबूराव शिंदे | समन्वयक (ग्रंथपाल) |
| प्रा.डॉ. प्रतापसिंह विठ्ठलराव मोहिते | सदस्य |
| प्रा. डॉ. बी.के.माने | सदस्य |
| प्रा.डी.जे.दमामे | सदस्य |
| प्रा.विजयालक्ष्मी आनंदराव नियोगी | सदस्या |
| प्रा. सौ. शैलजा हंबीरराव पाटील | सदस्या |

कासेगांव शिक्षण संस्थेचे,

# आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा,

ता. वाळवा, जि. सांगली.

: (०२३४२) २४२०३२

## - रॅगिंग प्रतिबंधक समिती -

| | |
|---|---|
| प्राचार्य डॉ. विलास गणपती काळे | अध्यक्ष |
| प्रा. डॉ.अरूण भगवान पाटील | सदस्य |
| प्रा. सुभाष अनंत जानराव | सदस्य |
| श्री.दत्तात्रय बाबूराव शिंदे (ग्रंथपाल) | सदस्य |
| श्री. प्रताप डी.पोमण | पोलिस प्रतिनिधी |
| श्री. उत्तम लक्ष्मणराव कदम | प्रसार माध्यम प्रतिनिधी |
| श्री. विनायक अनंत भोई | माजी विद्यार्थी प्रतिनिधी |

## - रॅगिंग विरोधी पथक -

| | |
|---|---|
| प्रा. डॉ.अरूण भगवान पाटील | सदस्य |
| प्रा. सुभाष अनंत जानराव | सदस्य |
| श्री दत्तात्रय बाबूराव शिंदे (ग्रंथपाल) | सदस्य |

## विद्यार्थी पारितोषिक योजना

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने महाविद्यालयात होणाऱ्या वार्षिक परीक्षांमध्ये विविध शाखांत प्रथम येणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थीनींना खालील पारितोषिकांची योजना जाहीर करीत आहोत.

### कायमस्वरुपी पारितोषिके

१. शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. पदवी व बी.कॉ. पदवी परीक्षेत महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या एका विद्यार्थी / एका विद्यार्थीनीस देण्यासाठी मा.श्री.राजाराम एस्.हाके पारितोषिक प्रत्येकी रू. १००१ प्रमाणे रू.४००४/-
व कृषी तंत्र विद्यालयात प्रथम येणाऱ्या एक विद्यार्थ्यास रू.१००१/-

२. शिवाजी विद्यापीठाच्या बी.कॉम.पदवी परीक्षेत महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी /विद्यार्थीनीस देण्यासाठी
अ) दि आष्टा पीपल्स को-ऑप.बँक सभासद व कर्मचारी जनकल्याण प्रतिष्ठान.आष्टा यांचे वतीने. रू. १००१/-
ब) कै. श्री.विलास बंडू सावंत यांच्या स्मरणार्थ श्रीमती नंदाताई विलास सावंत यांच्याकडून रू. ५०१/-

३. शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए.पदवी परीक्षेत इंग्रजी विषयात महाविद्यालयाम प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस देण्यासाठी प्रा. मंगला शामराव जोशी पारितोषिक रू. ५०१/-

४. शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए.पदवी परीक्षेत मराठी विषयात महाविद्यालयाम प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस देण्यासाठी कै.श्री.चुनिलाल त्रिलोकचंद पोरवाल यांचे स्मृती प्रित्यर्थ पारितोषिक श्री. विनोद पोरवाल यांचेडकून रू.५०१/-

५. शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए.पदवी परीक्षेत हिंदी विषयात महाविद्यालयाम प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस देण्यासाठी कै.श्री.परशराम शंकरलाल झंवर यांचे स्मरणार्थ पारितोषिक श्री. सुभाषचंद्र झंवर यांचेकडून रू. ५०१/-

६. शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए.पदवी परीक्षेत इतिहास विषयात महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस देण्यासाठी शंकरराव शिंदे उत्तरभाग सेवा सह.सोसायटी, लि.आष्टा ता.वाळवा.जि.सांगली यांचे वतीने रू. ५०१/-

७. बी.सी.ए.अभ्यासक्रम प्रथम,द्वितीय व तृतीय वर्षात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक प्राचार्या डॉ. दीपा विवेक देशपांडे यांचेकडून अनुक्रमे रू.५०१/- रू.३०१/- रू. २०१/-

८. प्रा.सौ. पौर्णिमा चव्हाण (उडूपी)वाणिज्य विभागप्रमुख यांचेकडून शिवाजी विद्यापीठ बी.कॉम.भाग - ३ अॅडव्हान्स् अकौंटन्सी पेपर - १ या विषयात महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रू. ५०१/-

९. १२ वी किमान कौशल्य विभागात ऑटो इंजि.टेक्नीशियन या विभागात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास डॉ. एन.बी.रजपूत श्री. जनरल हॉस्पीटल, इस्लामपूर यांचेकडून पारितोषिक रू.५०१/-

१०. १२ वी किमान कौशल्य विभागात इलेक्टॉनिक्स टेक्नॉलॉजी या विभागात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मे.प्राईम इलेक्टीकल्स, मेन रोड, आष्टा यांचेकडून पारितोषिक रू.५०१/-

११. इयत्ता १२ वी अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास कै. शिवाप्पा गुंडा वाघमोडे यांचे स्मरणार्थ प्रा. मधूकर शिवाप्पा वाघमोडे आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज,आष्टा यांचेकडून पारितोषिक २५१/-

१२. बी.ए.भाग ३ भूगोल विषयात महाविद्यालयात प्रथम येणाऱ्यास प्रा.डॉ.श्री.अरूण भगवान पाटील यांचेमार्फत पारितोषिक रू.५०१/-

१३. सिनिअर कॉलेज विभागात वक्तृत्व स्पर्धेत सर्वात जास्तीत जास्त सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यास श्री. शार्दुल बापट व श्री. स्वप्नील बापट यांचेकडून पारितोषिक रू.२५०/-

# कॉलेज गीत

परिसर आपुला, कॉलेज आपुले, आपुले एक कुटुंब
शिकण्यामध्ये लहानमोठे होऊ सारे गुंग ।

कॉलेज ठेवू स्वच्छ नि सुंदर, घर ठेवू अभंग
परिसर राखू सदैव आपुला, विकासकामी दंग ॥

शेते आपुली, वनराईही खुलवू फुलवू सारी
पशुधन आपुले पक्षीही आपुले शानच आपुली न्यारी

गावाची अन् कॉलेजची ही, अशीच जमली गट्टी
एकमेका साथ देवूनी दिली आळसा सुट्टी ॥

"चला विस्तारू क्षितिज" ध्येय आमुचे असे
ज्ञानातून श्रमातून सर्वांगीण व्यक्तिमत्व विकसे

शिकता शिकता मोठे होऊ, निश्चय ना हा व्यर्थ
भारतभूची आम्ही लेकरे, तिजला करु समर्थ ॥

जल देई ही अन्नही देई, देई वस्त्र निवारा
सुख शांतीही सकलजनांना, नसू दे दैन्या थारा

विज्ञानाची कास धरुनी, वैभव लाभो सकलांना
माणूस म्हणूनी जगु दे माणूस, कृपा करी ही दयाघना ॥

# महाविद्यालयाची ठळक वैशिष्ठ्ये

१. स्वच्छ, सुंदर व निसर्गरम्य परिसर.
२. प्रशस्त, समृद्ध, परिपूर्ण ग्रंथालय, आणि पुस्तक पेढीची सोय.
३. दृक् – श्राव्य साधनांचा वापर.
४. तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग.
५. सामान्यज्ञान परीक्षा घेण्याची सोय.
६. इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, ऑटोमोबाईल शिक्षणाची सोय.
७. स्पर्धात्मक परीक्षांचे केंद्र, व्यवसायिक व करीयर मार्गदर्शन.
८. विविध विषयांवरील चर्चासत्रे व परिसंवाद.
९. लोकनेते राजारामबापू पाटील आंतरमहाविदयालयीन वक्तृत्व स्पर्धा.
१०. सुसज्ज व्यायामशाळा, देशी –विदेशी खेळांची सोय, योगाभ्यास केंद्र.
११. राष्ट्रीय छात्रसेना (एन. सी. सी.)
१२. राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.)
१३. कृषी पदविका
१४. व्यक्तिमत्व विकासाची संधी.
१५. कमवा व शिका योजना.
१६. कॅन्टीन.
१७. मागासवर्गीय विदयार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी व आर्थिक सवलती.
१८. विविध प्रकारच्या सरकारी आर्थिक सवलती व शिष्यवृत्त्या.
१९. विविध पारितोषिके.
२०. पदव्युत्तर शिक्षणाची सोय.
२१. एम्.पी.एस्.सी. व यु.पी.एस्.सी. मार्गदर्शन केंद्र
२२. सर्व सोईनी सुसज्ज भव्य क्रिडांगण.
२३. सुसज्ज व भव्य व्यायामशाळा.

# संपादकीय....

## 'लहर' निर्मिती विषयी....

लोकनेते राजारामबापू पाटील यांची खेड्यापाडयातील तरूणांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी आणि सर्वांगीण विकास व्हावा अशी दृष्टी होती. त्यांच्याच प्रेरणेने या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वातील प्रतिभेला वाव मिळावा आणि तिचा विकास व्हावा ह्या भूमिकेतून प्रतिवर्षी 'लहर' हे वार्षिक प्रसिध्द केले जाते व त्याचीच परिणीती म्हणून गतवर्षी शिवाजी विद्यापीठ वार्षिक नियतकालिक स्पर्धा २०१५-२०१६ मध्ये आमच्या महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांच्या 'लहर' मधील लेखांना पारितोषिके मिळाली ही आमच्या महाविद्यालयाच्या दृष्टीने कौतुकाची व अभिमानास्पद गोष्ट आहे.

आजचा काळ हा प्रचंड स्पर्धेचा व माणसाच्या गुणवत्तेचा कस लावणारा असा आहे. अशा काळात महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास सर्व बाजूंनी होणे अत्यंत महत्वाचे आहे. यासाठी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वातील कलागुणांचा विचार हा अधिक महत्वाचा वाटतो. जीवन जगत असताना विविध प्रकारचे येणारे अनुभव हे विद्यार्थी कसा घेतो..तो अनुभवांना सामोरे कसा जातो..त्याची जीवनाकडे बघण्याची दृष्टी कशी आहे?कोणते प्रश्न त्याला आस्थेचे वाटतात?हे त्याच्या साहित्य निर्मितीवरून लक्षात येते. म्हणूनच सातत्याने महाविद्यालयीन विविध उपक्रमांबरोबरच विद्यार्थ्याला साहित्य निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे अत्यंत महत्वाचे ठरते.

आज विविध प्रकारच्या सुधारणा आणि सुविधा निर्माण होऊनही वर्तमान स्थिती गोंधळाची वाटते. अनेक प्रकारचे मोह एका बाजुला आणि माणसाला आधार देणारी नाती दुसऱ्या बाजुला यातील कोणते महत्वाचे हा आजच्या काळात संभ्रमात टाकणारा प्रश्न आहे.अशा स्थितीतही मोहावर मात करून माणसातले माणुसपण टिकविणे अत्यंत अवघड झाले आहे.आमचे विद्यार्थी या साऱ्या प्रश्नांना कसे भिडतात याचा अनुभव आपल्याला 'लहर' मधून येईल. म्हणून हे वार्षिक आपल्यापर्यंत पोहचविण्यात मला विलक्षण आनंद आहे.

## 'मुखपृष्ठ' विषयी....

कोणत्याही मासिकेचे मुख्यपृष्ठ हा त्याच्या अंतरंगाचा स्वच्छ आरसाच असतो.समाजातील घडामोडी स्थित्यंतरांचे स्पष्ट प्रतिबिंब त्यात झळकत असते.आमच्या महाविद्यालयातील बी.ए.भाग एक मधील विद्यार्थी **सौरभ साखरे** या उदयोन्मुख कलाकाराने रेखाटलेले प्रस्तुत मुखपृष्ठ हे अशा सामाजिक घडामोडींची कल्पक सुरेख आरासच आहे.गेल्या वर्ष दोन वर्षात समाजात जी सामाजिक, आर्थिक,औद्योगिक,वैज्ञानिक स्थित्यंतरे झाली याची दखल समाजाने घेतली.ही परिवर्तनाची लाट सामान्य माणसापर्यंत पोहचली. समाज मनाचा तळ मुळातुन ढवळला गेला.चुकलेल्या समजाला सुधारण्यासाठी जे प्रयत्न केले गेले.भ्रष्ट व्यवस्थेला शह देण्यासाठी

काही कठोर निर्णय घेण्यात आले या साऱ्यांचा चित्रमय आलेख यात रेखाटला आहे.

आरक्षणासाठी झालेले इतिहासाने नोंद घ्यावी असे 'मराठा आंदोलन', 'ॲट्रॉसिटी'साठी झालेला दलित संघटनांचा एल्गार 'निर्भया' च्या भययुक्त जीवनासाठी झालेले आंदोलन या भव्य मोर्चांची दखल या मुखपृष्ठाने घेतली आहे. स्वच्छता ही ईश्वरतेच्या खालोखाल महत्वाची मानली जाते.स्वच्छतेची सुरूवात स्वतःपासून करण्याचा संदेश स्वच्छता दूतांनी दिली. महात्मा गांधीजींचे सुराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याचा स्पृहणीय प्रयत्न, भ्रुण हत्येविरोधात उचललेली कठोर कायदेशीर पाऊले आणि 'कन्या बचाव' च्या आवाहनाची हाक येथे चित्रांकित केली आहे.

पाणी हे जीवन आहे.मानवी जीवनाच्या अस्तित्वासाठी पाण्याचा थेंब थेंब वाचवला पाहिजे ही ललकारी जलदुतांनी दिली.भ्रष्टाचार रोखण्यासाठी नोटाबंदीचा कटू निर्णय घेतला गेला त्याने सामान्यांच्या जीवनात खळबळ माजली.पण अल्पावधीत या वादळाने भ्रष्टतेची धुळ उडवून नेल्याने जनमन शांत झाले. अलीकडे दुरदर्शनच्या आक्रमणामुळे पिछेहाट झालेल्या आकाशवाणीला नवचेतना मिळाली.नवनव्या उपग्रहांच्या माध्यमातुन दळणवळण व व्यापारामुळे इतर देशांबरोबर संबंध सुधारले.

औद्योगिक क्षेत्रातल्या प्रगती मुळेच मुक्त अर्थव्यवस्थेने सर्व देशांत बाजारपेठ खुल्या झाल्या. शिक्षणाची दारे मोकळी झाली 'ब्रेन ड्रेनचे' रूपांतर 'ब्रेनगेन' मध्ये झाले.याच वेळी भारताने एकावेळी १०४ उपग्रह सोडून विज्ञान क्षेत्रात क्रांतीचे पाऊल टाकले. 'मेक इन इंडिया' तुन स्वयंपूर्ण भारताचे सुस्वप्न पेरले गेले. देशाच्या संरक्षणा बाबतही काही क्रांतीकारी पाऊले उचलली गेली. दहशतवाद विरोधात महत्वपूर्ण निर्णय व ठोस कारवाई आणि अन्य देशांचे सहकार्य मिळवण्याचा यशस्वी प्रयत्न केला गेला.

तरूणाईच्या मनातल्या नवनव्या कल्पनांना साकार रूप देऊन त्याचा मुक्त अविष्कार करण्यास चालना दिली गेली. या साऱ्या मानवी सृष्टीचे मूळ निसर्ग.या निसर्गाचे रक्षण,जतन व संगोपनाचा महामंत्र दिला गेला हाच मंत्र पर्यावरणाचा पाचवा वेदच ठरला आहे.

आजच्या काळातल्या प्रचलित घडामोडींचा चित्रमय आलेखच या मुखपृष्ठा च्या रूपाने सादर करण्याचा प्रयास केला आहे. आशा आहे या मुखपृष्ठातून मिळणारा संदेश रसिक वाचकांपर्यंत पोहचेल व त्यांना निश्चित अंतर्मुख करेल.

'लहर'ची मांडणी करत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास काळे यांचे मार्गदर्शन आणि माझ्या सर्व सहकारी प्राध्यापक,प्रशासकीय सेवकवर्ग,विद्यार्थी–विद्यार्थीनी तसेच आशीर्वाद प्रिंटर्सचे श्री.प्रणव चौगुले आणि त्यांचे सहकारी या सर्वांचे सहकार्य लाभले आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**संपादक –डी.जे.दमामे**

# प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग)

**प्राचार्य डॉ. विलास गणपती काळे**
एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी.

### मराठी विभाग :

प्राचार्य डॉ.विलास काळे

प्रा. आर.ए.पाटील

प्रा. डी.जे. दमामे

### इंग्रजी विभाग :

प्रा. विजयालक्ष्मी नियोगी

प्रा. गंगाराम मासाळ

प्रा. राजेंद्र कांबळे

### हिंदी विभाग :

प्रा.भगवंतसिंह भागवत (३१-१-२०१७ पर्यंत)

प्रा. विश्वास पाटील - सी.एच.बी.

प्रा. विकास पाटील - सी.एच.बी.

### अर्थशास्त्र विभाग :

प्रा. डॉ. बी.के.माने

प्रा. कु. स्मिता पाटील - सी.एच.बी.

### इतिहास :

प्रा. डॉ. प्रमोदकुमार ओलेकर

प्रा. एस.एन.दांडगे

### भूगोल विभाग :

प्रा. डॉ.अरूण पाटील

प्रा. अण्णासाहेब कदम - सी.एच.बी.

कु. निलिमा उर्फ गौरी खाडे - सी.एच.बी.

कु. एम.एम.मोमीन - सी.एच.बी.

### राज्यशास्त्र विभाग :

डॉ.संतोष कावडे - सी.एच.बी.

प्रा.लक्ष्मण कांबळे - सी.एच.बी.

### वाणिज्य विभाग :

प्रा. डॉ.प्रतापसिंह मोहिते

प्रा.डॉ.राम नाईक

ॲड. पंडीतराव बसुगडे

प्रा. कु. प्रणिता ऐतवडे - सी.एच.बी.

### शारिरीक शिक्षण विभाग :

प्रा.सुभाष जानराव

### पर्यावरण विभाग:

प्रा. गणेश माने - सी.एच.बी.

### ग्रंथालय विभाग :

श्री.डी.बी.शिंदे

### बी. सी. ए.विभाग :

प्रा.श्री. अभिजीत देसावळे

प्रा.कु.पल्लवी पाटील

प्रा.कु.स्वाती आटुगडे

| **कनिष्ठ विभाग** | | **एच्.एस्.सी.व्होकेशनल** | |
|---|---|---|---|
| श्री. खोत उत्तम कृष्णा | सहा.शिक्षक | श्री. खोत नितिन रघुनाथ | पु.वे.शिक्षक |
| डॉ.पाटील संगिता सुनिल | सहा.शिक्षक | श्री.पाटील जयवंत पांडूरंग | पु.वे.शिक्षक |
| श्री. शिंदे रघुनाथ आनंदा | सहा.शिक्षक | श्री. पवार माणिक विष्णू | पु.वे.निदेशक |
| सौ. पाटील शैलजा हंबीरराव | सहा.शिक्षक | श्री. तुळसणकर चंद्रशेखर भ. | पु.वे.निदेशक |
| श्री. निकम अर्जुन आबा | सहा.शिक्षक | श्री. यादव तानाजी | सी.एच.बी. |
| श्री. खोत सुभाष आबा | सहा.शिक्षक | सौ.साठे सुनंदा | सी.एच.बी. |
| श्री. माळी सुनिल भगवानराव | सहा.शिक्षक | श्री.पाटील संजय | सी.एच.बी. |
| श्री. डवरी अजित कृष्णा | सहा.शिक्षक | श्री.कदम अधिक | सी.एच.बी. |
| सौ.स्नेहल पाटील | सी.एच.बी. | श्री.नावडकर अच्युत | सी.एच.बी. |
| श्री. पाटील शरदचंद्र भगवान | सी.एच.बी. | सौ.देवकर ज्योत्स्ना | सी.एच.बी. |

## * पदव्युत्तर विभाग *

**मराठी**

प्रा. डॉ. व्ही. जी. काळे
प्रा. डॉ. एस. सी. लेंगडे
प्रा. एस.डी.कदम
प्रा. आर. ए. पाटील
प्रा.डॉ.एम.जी.तानवडे
प्रा.डी.जी.दमामे
प्रा.एन.के.गुंड

**हिंदी -**

प्रा. डॉ. व्ही. डी. सुर्वे
प्रा. डॉ. एस. बी. शहापूरे
प्रा. डॉ. व्ही.एन. सहदेव
प्रा. डी. सी. फसाले
प्रा. बी.बी.भागवत
प्रा. एस.पी.टिळे
प्रा. आर. ए. अंदोजी

**इंग्रजी**

प्रा. जी.बी. मासाळ
प्रा. डॉ.एस.जी.पाटील
प्रा. आर.एस.पाटील
प्रा. व्ही.ए.नियोगी
प्रा. टी.डी.पाटील (डांगे)
प्रा.डॉ. पी. व्ही घोरपडे
प्रा.एस.आर.हेगीष्टे(केसरकर)
प्रा. एस.पी.यादव(पाटील)

**इतिहास**

प्रा.डॉ.पी.ए.ओलेकर
प्रा.एस.एम.मोहिते
प्रा. डॉ.ए.एच.पाटील
प्रा. एम.बी.पाटील
प्रा. बी.जी. बोराटे

प्रा. बी. एस. मिणचेकर
प्रा. एस.एन.दांडगे
प्रा. व्ही.आर.माने

**एम. कॉम.**

प्रा.डॉ.पी.व्ही.मोहिते
प्रा.डॉ.डी.के.मोरे
प्रा.डॉ.बी.के.माने
प्रा.एम. ए. दीक्षीत
प्रा.डॉ.टी.के.जाधव
प्रा.डॉ.एच. पी. शिर्के
प्रा.डॉ.एस.आर.पवार
प्रा.डॉ.आर.एन.नाईक

## प्रशासकीय सेवक वर्ग

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. प्रमोद फार्णे** | मुख्य लिपिक | **श्री. जगन्नाथ मोरे** | ग्रंथालय परिचर |
| **श्री.सुहास जाधव** | वरिष्ठ लिपिक | **श्री. संजय पाटील** | ग्रंथालय परिचर |
| **श्री. संजय शिंगटे** | वरिष्ठ लिपिक | **श्री.प्रसाद पाटील** | लॅब असिस्टंट |
| **श्री. मधुकर मदने** | वरिष्ठ लिपिक | **श्री.विजय विरभक्त** | शिपाई |
| **श्री.प्रकाश पाटील** | कनिष्ठ लिपिक | **श्री. जगन्नाथ गावडे** | शिपाई |
| **श्री. तानाजी गाडेकर** | ग्रंथालय लिपिक | **श्री. मारूती कोळी** | शिपाई |
| **श्री. राहुल सावंत** | कनिष्ठ लिपिक | **श्री. शिवाजी सुतार** | शिपाई |
| **श्री. युवराज वायदंडे** | कनिष्ठ लिपिक | **श्री. युनूस अत्तार** | शिपाई |
| **श्री. गौतम पेटारे** | ग्रंथालय परिचर | **श्री. महेंद्र भंडारे** | शिपाई |
| **श्री. अस्लम महाब्री** | ग्रंथालय परिचर | **श्री.महावीर अवघडे** | शिपाई |



# अनुक्रमणिका

१) आठवणीतलं बालपण ............................................ याडगे अजय मोहन, बी.ए.भाग.३
२) आई (कविता)............................................ कु. नाईक कविता शशिकांत, बी.ए.भाग.१
३) मेंढपाळाची कथा आणि व्यथा ................................गावडे नरेंद्र नानासो, बी.ए.भाग.३
४) कसं असत नातं दोघांच? (कविता) .......................कु.यादव कोमल बाजीराव, बी.ए.भाग.२
५) विचारमंथन (कविता)............................................ कु.झेंडे प्रियांका दिनेश, बी.ए.भाग.३
६) दहशतवाद जागतिक समस्या ...........................कु.कुरोलीकर नम्रता निळकंठ, बी.ए.भाग.३
७) प्रसिध्द जोडया (कविता) ...................................... कु.पवार ऋतुजा दिलीप, बी.ए.भाग.१
८) हरवलेली नाती ................................................... कु.झेंडे प्रियांका दिनेश, बी.ए.भाग.३
९) कोणाच्या डोळ्यात काय दिसते? (कविता) ............. कु.गायकवाड मोनिका राजेंद्र, बी.ए.भाग.१
१०) आई (कविता)...................................................कु.घनवट मयुरी तानाजी, बी.ए.भाग.१
११) जीवन सुंदर आहे...............................................कु.सलगर सारीका कृष्णा, बी.ए.भाग.१
१२) नको हा स्त्री जन्म ........................................... कु.आपुगडे मोनिका रविंद्र, बी.ए.भाग.३
१३) विसरलो आहे (कविता) ........................................ कु.पाटील पुजा वसंत, बी.ए.भाग.३
१४) संत साहित्याची गरज........................................... कु.कोळी ज्योती कुमार, बी.ए.भाग.१
१५) माझं म्हणायचं असतं (कविता) ...........................कु.यादव कोमल बाजीराव, बी.ए.भाग.२
१६) एक तरी मुलगी असावी (कविता) ..........................कु.मोहिते नम्रता बजरंग, बी.ए.भाग.३
१७) आम्ही मराठी ..................................................... कु.पाटील पूजा वसंत, बी.ए.भाग.३
१८) म्हणी - नोटा बंदीच्या ..........................................कु.ऋतुजा दिलीप पवार, बी.ए.भाग १
१९) ईलिक्षण ................................................................ येरडे अमोल बाळू, बी.ए.भाग.२
२०) आधार गरज की संस्कार (एकांकिका) .................. कु. देसावळे सोनाली सुरेश, बी.ए.भाग.३
२१) माणसे अशी का वागतात? (कविता) ..................... कु.घनवट मयुरी तानाजी, बी.ए.भाग.१
२२) जैव विविधता आणि तिचे संवर्धन ........................कु.हवालदार सोनाली अधिक, बी.ए.भाग.१
२३) जीवनातील परिक्रमा ............................................ कु.काटकर तृप्ती सुरेश, बी.ए.भाग.२
२४) पंचायतराज ...................................................... साखरे सौरभ गजानन, बी.ए.भाग.१
२५) मैत्री (कविता) ................................................. कु.मगदूम प्रणाली बाळासो, बी.ए.भाग.३
२६) जगातील दुःख नाहिसे झाले तर? ........................... कु.पवार निशिगंधा विष्णू, बी.ए.भाग.३
२७) आयुष्य (कविता) .............................................. कु.सलगर सारिका कृष्णा, बी.ए.भाग.१
२८) सलाम शहिद वीरांना ......................................... कु.मगदूम प्रणाली बाळासो, बी.ए.भाग.१
२९) मराठा म्हणावे अशा वाघराला ................................माने नेताजी सर्जेराव, बी.कॉम.भाग.१
३०) माध्यमांची मोडतोड ........................................ कु.झांबरे आशुमती विजय, बी.कॉम.भाग.२
३१) देशासाठी बलिदान दिलेला थोर वीरपुरूष .......... कु.कोळी सोनाली विजयकुमार, बी.कॉम.भाग.२

# आठवणीतलं बालपण

- घाटगे अजय मोहन
बी.ए.भाग-३(मराठी)

बंच्याप्पाच्या बाभळीच्या बनातील रान पाखरांचा किलबिलाने जाग यायची. हर एक रानपाखरांचा आवाज कानावर पडायचा. मोर, लांडोर, यांच केकाटण,चिमण्यांच किलबिलणं, कोकीळीचा मंजुळ आवाज कानावर पडला की, आपोआप जाग यायची, दिवस उजाडला की तांबूस रंगाचा सडा आमच्या विठ्ठलवाडीवर पडायचा. विठ्ठलवाडी पलूस तालुक्याला जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरच आमचं हे गांव.कृष्णामाईच्या संथ वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे. गोड लोकांचा गोतावळा असणारी अशी ही विठ्ठलवाडी. गावाला वारकरी संप्रदायाच मोठ वेड. गावात विठ्ठलाच देऊळ बांधलं विठ्ठलाच्या नांवावरून गावाला विठ्ठलवाडी हे नांव पडलं.विठ्ठलवाडीला घोल हे दुसर नांव बरं का! बहुतेक हे गांव आमणापुरपासून विभक्त झाल्यामुळ मोठा घोळ निर्माण झाला की काय म्हणून घोल पडल कोणास ठाऊक. अशा या घोलात गावाच्या ह्या टोकापासून ते रेल्वे गेटापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा प्रत्येकाची छोटी छोटी कौलारू घर. गांव तस छोट पण राजकारणामुळ त्याच महत्व खुप मोठ.विकासाच वार वाहू लागलं गावानं अनेक पुरस्कार मिळवले. निर्मलग्राम आरोग्यग्राम, विमाग्राम, तंटामुक्त गांव अशा अनेक पुरस्कारांचे तुरे आमच्या गावाच्या शिरपेचात आहे .अशा या घोलात आमचा मित्रपरिवार, बाल संवंगड्याचा खूप मोठा जिव्हाळा बरं का.....!!

माझा चुलता तानाजी आण्णा सतत म्हणायचा खायली आळीं आणि वरली आळी एक नंबर...आणि मधल्या आळीला काय बी न्हाय.. खायल्या आळीला राम-लखनची जोडी फेमस, विजू आवट्या त्याला बालपणी ठोसे मारायचा लय मोठा नाद म्हणून त्याच नांव आमी 'आण्ण्या बॉक्सर'असं ठेवलं.अज्या औटे आणि कुस्त्या, खंड्या,संग्र्या (माळावरचा तेंडुलकर) हे खालच्या आळीचे नमुने, मधल्या आळीला संगऱ्या बुव्या,मह्या बापु,पका दादाचा आक्ष्या, बाबसू नानाचा चोचरा गन्या, राड्यांचे आमल्या आणि पप्या, मी आणि पांडा असा आमचा घोळका असायचा वरल्या आळीला कोळ्याचा परशा...परशाच्या बा उत्या नाना सारखा शिगारेट ओढायचा म्हणून पोरांनी परशाच नांव 'नाना बिडी' अस ठेवलं. त्याच भरीत भर म्हणून परश्याचे पुढचे दोन दात किडलेले उंदराने कुरतडल्या सारखे म्हणून परशाच विषारी हे दुसर नांव.पांडा ढेरे,आमल्या आवटे-भारताच्या टिम मधला हेमांग बदाणी सारखा त्याचा चेहरा म्हणूनआ ा म ल य ा ल ा सारेजण बदाणीच म्हणायचे क्रिकेटच त्याला भारी वेड..मातंगाचा पक्या,किश्या,रामुशाचा दिव्या, सगुना, आत्तीचा आज्या हे वरल्या आळीचे हिरे बरं का!!

अशा तिन्ही आळ्यामध्ये तांदळात वेचलेल्या खड्याप्रमाणे गावात ओळखली जाणारी अशी आमची गँग होती.शिवारात कोणाच्या रानात शेंगा,कोणाच्या रानात हरभरं तर कोणाच्या रानात गाजर इत्यंभूत माहिती मातंगाच्या पक्याकडून मिळायची, मग सुट्टी दिवशी रानाच्या ऊसाच्या आडोआडोशान शिवारातली समदी आंब्याची, पेरवाची झाडं मोकळी करायची,

पोटभर गाजरं,शेंगा,हरभरा आणि हावळा पार्टी ठरलेलीच असायची.रंगा तात्याच्या हिरीवरचा राघू आंबा आमच्या टोळक्याचा सगळ्यात आवडता आंबा.... शिवारातील या रानमेव्याची चव चाखत चाखत खांद्यावर टॉवेल आणि डोक्याला चड्डुया अडकवून आम्ही कृष्णामाईच्या डोहाकडे जायचो,

दिवसभर कृष्णामाईच्या पाण्यात पोहायचं. पलिकड पोहत जाण्याची स्पर्धा खेळायचो. पात्रात निम्म्या पर्यंत गेलं की दमछाक व्हायची जीव नरड्याला यायचा मग आबा अंबकऱ्याच्या नावेचा आधार घेऊन पलीकड जायचं. पलीकड पाणवठयाला चिंचा आणि नारळीची मोठी झाडं, गाभाळलेल्या चिंचा खाताना आपोआप डोळे झाकायचे. मळीची तोंडली म्हणून कडवट छिन्न्या एकमेकाला खायला द्यायच्या.

कृष्णामाईच्या तांबडावर जाऊन नदीच्या अंतरंगातील नविन गोष्टींमध्ये रंगायचो नंतर अलिकडे येऊन गावपाणवठ्याला सोबत आणलेल्या तेल,चटणी, आणि भाकरी, पातीच्या कांद्याबरोबर फडशा पाडायचो... एकांतात मन उदास झालं की मळीला येऊन संथ वाहणाऱ्या कृष्णामाईकडं बघत बसायचो. मन प्रसन्न होण्यासाठी माझा बराचसा वेळ नदीवरच घालवायचो. मळीजवळ असणाऱ्या ओढ्यातून मोरांच्या वेगवेगळया आकारांचे मोरपंख शोधणं हा आमचा आवडता छंद...

मनसोक्त पोहून झाल्यावर आमची पावलं गंजीखान्याकडे माळावर वळायची असं हे आमचं टोळक सिझनेबल खेळ खेळायचं....क्रिक्रेट,गोट्या,आयरे, सूर-फाट्या,सूर पारंब्या,लपा-छपी,आंगा-भोंगा, विट्टी-दांडू, असे अनेक खेळ खेळायचो, क्रिकेट सगळ्या पोरांचा आवडीचा डाव, माळावर उन कळायचं नाही की पाऊस कळायचा नाही,दिवसभर माळावर क्रिकेटचा डाव रंगायचा, संगऱ्या आवट्याला आम्ही सारे जण 'माळावरचा तेंडुलकर' म्हणायचो, संगऱ्याची उंची खूप लहान पण संगऱ्या खेळायला लागला की लवकर आऊटच व्हायचा नाही.आमचा माळावरचा तेंडुलकर खेळायला लागला की आम्ही त्याच्या म्हसरांच्या पाठीवर बसून म्हसर हिंडवायची म्हसरांच्या पाठीवर बसून पुस्तक वाचायची, संगऱ्याच्या या क्रिकेटमुळ संगऱ्याच्या घरची काम तशीच पडून राहायची. संगऱ्याचा बा म्हादा काका त्याला क्रिक्रेटचा खूप राग, म्हादा काका आणि आमल्याचा बा मधू आण्णा यांनी माळावर एंट्री टाकली की आमची पळता भुय थोडी व्हायची, ऊसातून सरीत वाकून पळून जाताना गुडघे आणि हाताची ढोपर रक्तबंबाळ व्हायची. म्हादा काका हात धूऊन आमच्या माग लागायचे क्रिक्रेटच्या वेडापायी संगऱ्यानं शाळा सोडली. याचा म्हादा काकाला खूप राग होता. क्रिकेटच्या स्पर्धेला खेळायला गेलं की पंचक्रोशीतली पोरं संगऱ्याला आपल्या टिममधून खेळायला न्यायची. संगऱ्यान अशा कित्येक मॅच त्यांना जिंकुन दिल्या. असा हा आमचा संगऱ्या (माळावरचा तेंडुलकर) आमच्या बालगोपाळांच्या गळ्यातला ताईत झालेला. म्हादा काका संगऱ्याला क्रिक्रेट खेळायला लावून देईना झाला की आम्ही म्हादा काकाला फुगवायचो काका काका तुमचा संगऱ्या काय खेळतो माहीत आहे का? काल रात्री येळावीला खेळायला गेलो तर येळावीतील माणसं सुध्दा विचारत होती तुमचा तो संगऱ्या कुठ हाय?तो नाहीतर तुम्ही जिंकणार नाही, आणि झालं की तसच आम्ही मॅच हरलो. संगऱ्या असता तर मॅच जिंकलो असतो आम्ही. अस कळवळून बोलंल की काकाला संगऱ्याचा अभिमान वाटायचा.

गोट्या खेळायला लागलो की हणमा पवार

गोट्या टिपायचा गोटी टिपली रे टिपली की फटा फट गोट्या फुटतील या भितीने हणमा पवारची खेळातुन हकालपट्टी ठरलेली असायची

एकलम खाजे,दोबी राजे,तिरांट भोंजा,चारी चौकटा ,पाचल पांडा,सय्यक दांडा,सात कोतले, अष्टक नल्ले, नविनव किल्ले,दस्सी गोला,अकल खरकटा,बरळू मरकटा,तेरलिंग सोटा,चौदा हाती लंगोटा असे बोल गोट्या खेळताना, टिपताना म्हणायचे हे बोल बोलताना खेळाला वेगळीच गंमत असायची.

ग्रामीण भाषेतील हे बोल बोलताना खेळाला एक वेगळाच रंग चढायचा खेळाबरोबरच सण आणि उत्सवामध्ये आमच्या या टोळ्याचा रूबाब वेगळाच असायचा. गणपतीचा सण आला की,घोलातल्या चार गणपती मंडळांची विद्युत रोषणाई आणि गणपतीच्या मुर्तीचा थाट-माट बघायला पंचक्रोशीतील लोकं यायची. आमच्या टोळक्यातली बरीच मंडळी उत्कृष्ट नाटक कलाकार होती. प्रत्येक जण मोठ्या उत्साहाने समाज प्रबोधनपर विनोदी,कौटुंबिक नाटकांचे बहारदार कार्यक्रम सादर करीत. आम्ही बालगोपांळांनी प्रत्येक सण मोठ्या उत्साहाने साजरा केला. गुढीपाडव्याला गुढीची काठी धुवून आणायची,अख्खी विहिरचं गुढीच्या काठ्यांनी भरून जायची. आपल्या घरापुढील गुढी उंच दिसावी यासाठी आम्ही आजोबांना मोठी काठी घेऊन यायला सांगायचो. गुढीला लावलेली रंगीत सारखमाळ कधी एकदा जिभेवर पडते असं वाटायचं. साखरमाळ खाण्यासाठी घरात भावंडाची भांडणं लागायची.नवरात्रीचा उत्सव काही न्याराच, दांडिया आणि गरबा खेळण्यात रात्र रात्र जागायचो. नागपंचमीला मोठी कैची बांधायची मनसोक्त झोपाळ्यावर झुलायचं आणि जिगावरती फिरायचं, वटपोर्णिमेला शाळे जवळच्या वड्याच्या झाडापाशी भडजीची मान आमच्या टोळक्याकडेच असायचा.

पोतीभरून आंबे साठवायचे आणि फस्त करायचे. रंगपंचमीला रंगाची उधळण करायची त्याची पंधरा दिवस आगोदर पासूनच तयारी असायची,

शेवरी,गुळभेंडी,हळद,पळसाच्या फुलांपासून रंग तयार करून ठेवायचे, लहानांपासून मोठ्या माणसांपर्यंत सगळ्यांना रंगवून टाकायचे.

बेंदराला बेरींगचा गाडा तयार करायच. चिखलाचा बसलेला मोठा बैल तयार करायचा सजवून त्याची मिरवणूक काढायची, आला रं आला..... बशा बैल आला म्हणून आरोळी ठोकायची. गाड्यांच्या शर्यती लावायच्या नव्याच्या पौर्णिमेला कृष्णामाईला परडी सोडायला जायचो अंधारात परडीवरील कणकिचे दिवे पाण्यात तरंगताना कृष्णामाईच लखलखणार रूप डोळ्यामध्ये साठवायचो, होळीला शिणकुटं आणायला माळावर जायचो गावातल्या बाया माळावर शिणकुटं राखायला बसायच्या आपल्या आपल्या शिणकुटांच्या तळातली पाच पाच शिणकुटं द्यायच्या. आमच्या टोळक्यांतील पंचवीस शिणकुट घेतल्याशिवाय चैन पडायचं नाही. ज्या बायांनी आम्हाला शिणकुट दिली नाहीत त्या बायका स्वयपाकाच्या नादाला लागल्या की त्या बायांचा तळ माळावर दिसायचा नाही, बैलगाडी भरून शिणकुट पळवून आणायची.दुसऱ्याची होळी पेटल्यावर त्यातला इस्तु चोरून आणून आपली होळी पेटवायची. 'आज पोळी उद्या नळी बामन मेला संध्याकाळी' अशी आरोळी ठोकायची.तोंडावर हात मारून बोंबा मारून होळी भोवती फिरायचं. कातडी डिमड्यांचा आवाज येईना झाला की घरातील पितळी घंघाळ चेपेपर्यंत बडवायची. सकाळी धुलवडीला होळीच्या राखेचे गोळे करायचे एकमेकाला फेकून मारायचे आणि मटणावर ताव मारायचा दिवाळीची

मज्या तेवढीच न्यारी लाडक्या शिवबाचे किल्ले बनवायला धांदल उडायची आपला किल्ला चांगला दिसावा यासाठी प्रत्येक जण किल्ल्यासाठी राबायचा तालुक्याला जावून मावळे खरेदी करायचे. किल्ला तयार करताना नाना क्लुप्त्या आणि शकक्ली लढवायच्या फटांगड्या आपल्याजवळ असाव्यात असा प्रत्येकाचा उत्साह असायचा. कनुभयच्या स्टॉलवर फटाके खरेदी करायचे दिवाळीच्या फराळाची चव चाखायची. येथेच्छ फराळ करायचा लव्हाळ्याच्या काड्याचा नाग तयार करायचा. दिवा घेऊन गावात प्रत्येकाच्या घरी तेल मागायला जायचं. दिवा घेऊन गेल्यावर प्रत्येकाच्या घरासमोर पांडवांची गाणी म्हणायची. ही गाणी चालीमध्ये म्हणतात ओरडताना आमच्या टोळक्याला भारी चेव चढायचा. शाळेतील कविता जेवढ्या सहजतेने म्हणता येणार नाही तेवढी ही गाणी आमचे बहाद्दर टोळकं सहजतेन म्हणायची–

"दिन दिन दिवाळी , गाय म्हशी ववाळी
गायचा चारा ,बाशिंग बांधा
नवल कुणाच ,लक्ष्मणाच
चोळून बोळून ,केल्या गुंजा
आठ म्हशी,नव गया
आपट दुपट कोण खाईल
इल बळी, पिऊन जाईल "

कोळ्याच्या उत्या नानाच्या घरासमोर आमचं हे ठरलेलं गाण असायचं....

"दाडी बोकडाची,मिशी उंदाराची
फिरवीन चकार, मारीन डुक्कार
शंभर नानाचे...."

हे गाणं म्हटल्यावर नानाची बायको शिव्या देतच तेल घेऊन बाहेर यायची....

"वाकडी तिकडी बाबळ ,त्यात होता व्हला.
म्या दिला टोल्ला ,वल्ला गेला गंगेला...
गंगेची माणसं , मक्याची कणसं.
तिळाची पिंडी ,हरी बामणाची शिंडी"

अशी गाणी आठ–ते दहा दिवस प्रत्येकाच्या घरासमोर म्हटली जायची शेवटच्या दिवशी प्रत्येकाच्या घरातून खोबऱ्याची वाटी घ्यायची जमलेल तेल आणि खोबरं कनुभयच्या दुकानात विकायच आणि मिळालेले पैसे वाटून घ्यायचे

अशा प्रकारे प्रत्येक सणांमध्ये आम्हा बालगोपाळांचा आनंद काही न्याराच आम्ही सणांचा आनंद घेतला आणि आनंद वाटला. आमच्या या आठवणीतल्या बालपणाचा विचार करता आता गावामध्ये रानपाखराचा आवाज कानावर पडत नाही. शेतीच्या बाजारीकरणामुळे वाऱ्यावर डोलणारी शाळू,हायब्रिड, कणस लोप पावली, रानपाखरांची किलबिलाट,चिवचिवणाऱ्या चिमण्यांची संख्या घटली. थव्याने नजरेत पडणाऱ्या या चिमण्या आता कुठेतरी एखादी नजरेस पडते. गावातली पोरं खेळात रमत नाहीत की कोणता सण उत्साहाने साजरे करत नाहीत. मातीतले खेळ मातीला मिळाले, गावगाड्याचं रुपच पालटलयं गावातल्या कौलारू घरांची जागा आरसीसी इमारतींनी घेतली. गांव पंचायती जवळची वडाची आणि गुळभेंडीची झाड तोडली. अनेक मोठी मोठी झाड तोडली. त्या जागा भकास झाल्या, भुंड्या झालेल्या माळावर गंजीखान्यात द्राक्षाच्या बागा झाल्या, ऊस पिकवला गेला त्यामुळे क्रिक्रेटच वारं तर कधीच विरून गेल. खेळायला मोठ मैदान राहील नाही. सणांच तर विचारून नका आता सण उरलेत ते फक्त गोड–धोड खाण्यापुरतेच, चिंचेच्या आंबट–गोड चट्टा मट्ट्याची चव जिभेला मिळत नाही. सुर पारंब्या खेळायला झाडाचं राहिली नाहीत. पोहायला विहिरींना पाणी

नाही.

रडत कढत का होईना आमचे हे गावातले हिरं (टोळंक) शिकलं सवरलं, नोकरीला लागले. आताची तरूण पोरं अडकली व्हॉट्सअॅप, स्मार्टफोन आणि मोबाईल गेम या जौजाळात अडकली शिवारातला रानमेवा खाऊन आम्ही टुणटुणीत राहिलो. आताची पोर बोर्नव्हिटा, मॅगी,पिझ्झा आणि बर्गर खाऊन 'हात पाय काडी आणि पोट नरसोबाची वाडी' असे झालेत. खेळातून आमचा व्यायाम व्हायचा .आताची पोरं, मोबाईलच्या नादाला लागली मग कुठला आलाय खेळ आणि कुठला आलाय व्यायाम. इथं तर सगळ्या गावागाड्याचं रुपचं पालटलयं.

आमचे बालपणीचे दिवस निघून गेलेत. आणि राहील्यात फक्त आठवणी. टोळक्यांसोबत घालवलेला क्षण आणि क्षण आठवला की आपसुकच डोळ्यासमोर बालपण उभ राहतं. आमचे मित्र बालगोपाळांचा थवा एकत्र आला की 'आठवणीतल्या बालपणाचें' दाणे टिपत बसतो.

---



# आई

कंठात स्वर दाटे
हृदय ही भरून येई
येता आठवण तुझी
डोळ्यांत पाणी येई !!१!!

देऊनी जन्म मजला
कष्टात वाढविले तू
सोसून दुःख सारे
तू हास्य मजला दिले !!२!!

संस्कार शिक्षणाची
ज्ञान ज्योत तूच लावली
राहो तेवत ती सदा
त्यासाठी तूच झिजली !!३!!

उपकार अनंत तव हे
न कळे कसे फेडावे
मज चामडयाचे वाहने
तव पायी वाटे घालावे !!४!!

दुःखात सुखी राहणे
तूच मजला शिकवले गं
पेरीन बीज या जगी
तवं शिकवणीचे आई !!५!!

ठायी -ठायी मन माझे
तवं चरणी धाव घेई !!६!!

**नाईक कविता शशिकांत**
**बी.ए. भाग-१**

# मेंढपाळांची कथा आणि व्यथा

- नरेंद्र नानासो गावडे
बी.ए. भाग-३(इंग्रजी)

सकाळाची साधारण नऊची वेळ मी आणि माझा मित्र धनगरांच्या मुक्कामी तळास भेट देण्यास गेलो. आम्ही तेथे गेल्यावर आम्हाला पहायला मिळाला तो,डोक्यावर गुलाबी फेटा,कपाळावर भंडारा खांद्यावर घोंगडे ,गळ्यात जाडजुड गोफ,हातात कडा, पायात तोडे, हातात कुऱ्हाड,पायात वहाणा, पाहणाऱ्यालाच्या मनात घडकी भरविणारा त्याचा भरदार देह, असा तो धनगर.

आम्ही तेथे गेल्यानंतर त्यांनी आमचीच हजेरी घेण्यास सुरूवात केली. कोण हायसा? का आलाय? काय पायजे? ही माहिती तुम्हाला दिल्यावर आम्हाला काय मिळणार हाय? का, आमच्या जनांवरांना दवा,पाणी मिळणार आहे? असे एक ना अनेक प्रश्नांचा त्यांनी आमच्यावर भडिमार केला.

त्यांनी आम्ही आमच्या भेट देण्याचे करण सांगितल्यावर त्यांनी आम्हास माहिती देण्यास स्पष्टपणे नकार दिला. इतर घटनांमधून आलेला राग त्यांनी आमच्यावर काढायला सुरूवात केली कारण या पुर्वी अनेक जणांनी त्यांच्याकडून विविध माहिती नेली होती, अश्वासने दिली होती पण, त्यांची पुर्तता झाली नव्हती ते म्हणाले कह, जा तुम्हाला काय लिहायचे ते लिहा जावा, तुमाला कायबी माहिती मिळणार नाय.पण आम्हाला माहिती मिळवायचीच होती,आम्ही त्याच्याजवळ गेलो त्यांना विनवणी केली, म्हटले काका, आम्हाला तुमच्याविषयी थोडे जाणून घ्यायचे आहे. तुम्ही तुमचे काम थांबवू नका तुमचे काम चालू असू द्या आम्ही तुमच्या मागे-मागे येवून यावर ते म्हणाले बरं बरं, उगाच तुमी हितवर एवढ्या आडरानात आलायसा म्हणून माहिती देतो ईचारा काय ईचारायचं ते. मग त्यानंतर आमच्यात जो काही संवाद झाला त्याचा काही भाग येथे मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे,

आमी हा जो धंदा करतोय तो आमचा पिढीजात आहे. आमच्या आज्या-पंज्यापासून आमी तो करत आलो आहोत.पूर्वी या धंद्यात बरकत होती. फिरण्यासठी मोकळी जागा होती कोठेही तळ मारत होतो. कोणी कायबी बोल लावत नव्हते, जसजशा पाण्याच सोयी झाल्या पाईपलायनी साऱ्या माळावरून फिरल्या आणि लोकांनी बारा महिने तेरा काळ शेती पिकवायला सुरूवात केली आणि दिवसे-दिवस चराई क्षेत्र कमी झाले. परिणामी आमच्या धंदा आम्हाला कमी करायला लागला. आमच्या आजोबांच्या वेळी त्याच्या २००-२४० मेंढ्या होत्या या आता फक्त ५०-६० उरल्या आहेत

हा व्यवसाय करणे कठीण झाले आहे. रोज ३०-४० कि.मी पायपीठ करूणही मेंढ्यांची पोटे भरत नाहीत. एखाद्या शेतकऱ्याच्या शेतात एखादे जनावर गेले तर त्या शेतकऱ्याच्या शिव्या खाव्या लागतात. प्रत्येकवेळी शिव्यावरंच भागेल असं नाही, तर मार ही खावा लागतो. त्यामध्ये आम्हालाच नमते घ्यावे लागते, करण उद्या त्यांच्याच शेताच्या भाजूने मेंढया न्यायच्या असतात. रामाच्या नशिबात १४ वर्षाचा वनवास होता

आमचे आयुष्य म्हणजे एक वनवास आहे, आज एक गांव तर उद्या एक गांव, महिन्या-दोन महिन्यातून एक-दोन दिवस गावी परत यायचे, रोजचा दिवस अगदी साच्यातून अगदी कालच्या दिवसा सारखाच असतो. रोज रानात मुक्काम करणे, सकाळी,लवकर उठून लहान पिलांना दूध पाजणे,तोंड धूवुन चहा प्यायचा आणि डहाळा आणण्यासाठी जायचे, तोपर्यंत आमच्यातीलच एकजण जेवण बनवतो, तेथेच उघड्या आभाळाखाली जेवायचे आणि मेंढ्या चरण्यासठी घेऊन जायचे. संध्याकाळी परत यायचे. आठवडा भरानंतर सारा बोजवारा डोक्यावर घेऊन दुसऱ्या लांबच्या शेतात किंवा गावात जायचे.

पुर्वीच्या ज्या आमच्या कला होत्या त्या आता संपण्याच्या मार्गावर आहेत. कारण आमच्या व्यवासायात आमची पुढील पिढी येण्यास धाजवात नाही.आमालाबी त्यांनी यामध्ये येऊ नये असेच वाटते.त्यांनी शिकावे आणि दुसरा काहीतरी उद्योग करावा असे वाटते जे वनवासी जगले आमच्या वा याला आले ते त्यांच्या नशिबी येऊ नये. आमच्या धनगरी ओव्या, ढोल वादनातील कसब,कला लोकरीपासून घोगडी,स्वेटर, टोप्या बनवणे, वापर जेवणाची जाळी या वस्तू आमच्या पुढील पिढ्याला बनवता येत नाहीत, त्यामुळे त्या आता संपण्याच्या मार्गावर आहेत.

साधारणपणे मेंढ्या ६ महिन्यातून एकदा कातरता येतात.त्यांची लोकर आता आम्ही व्यपाऱ्यांना विकतो.आम्ही ईमानी आहोत. कोणला फसवत नाही. मात्र इतर लोक आमच्या आज्ञानी असणाचा फायदा घेतात, शेतात मेंढ्या चोरणे, राजकारणी लोक मतासाठी आमच्या पाया पडतात आणि वेळ आली कि, सोयीस्करपणे पाठ फिरवतात.

मागील वर्षी (२०१४-२०१५) आमच्या लोकांनी दोन ते अडीच हजार मेंढ्या फोंडाच्या दगावल्या त्यावेळी आमच्या मदतीसाठी कोण आले? प्रत्येकाने त्याचाही आपल्या चुमड्या भरण्यासाठी उपयोग करून घेतला, वेगवेगळी माहिती फॉर्म भरून घेतले पण त्याचा कोणताही फायदा आम्हाला मिळाला नाही, साध्या दवा-पाण्याचीही व्यवस्था झाली नाही शेवटी परमुलाखातून औषध आणून आम्हाला आमचे धन वाचवावे लागले. कोणामंत्राच्या पाया पडण्यासाठी आम्ही जाम नाही आणि धनगरांना आरक्षण मिळवून देतो म्हणून ज्यांनी जातीचे राजकारण केले ते लोक आता या भांडवलावर मंत्रिपदाचे सुख घेत आहेत. कितीही मेळावे घेतजे, सभा घेतल्या तरी त्याचा काही उपयोग झाला नाही. आमची मुले शिकली पण नोकरी आता गरीबाची राहिली नाही. कोठेही जायचे साधी शिपायाची नोकरी मिळण्याची तरीपाच-सहा लाख पुरत नाहीत मग ती या व्यवसायात येतात आणि त्यांची जगाबरोबरची नाळ तुटते.रात्रंदिवस रानात राहिल्याने एखाद्या लहान शहरात जरी नेऊन सोडले तरी तेथून घरी जायचे तर त्यांना ते अशक्य होते.

गावाकडे शेत नाही राहण्यापुरत जागा, मंढ्यांच्या विनाऱ्याची सोय नाही, त्यामुळे मेंढ्या वर्षातुन १ पिलू होते, मटनाचा दर आज आभाळाला गेला असला तरी त्याचा आम्हाला काही उपयोग नाही, लोकरी तुनही जास्त उत्पन्न मिळत नाही. एखाद्या साथीचा आजार आला तर घरदारावर कर्ज काढावे लागते आणि जनावरे जगवावी लागतात, वेगवेगळ्या ठिकाणचे पाणी, हवामान,उघडयांवर राहणे यामुळे आमचेही आरोग्य व्यवस्थित नसते.

धनगर म्हणजे धनाचे आगार त्याच आगाराला आज खिंडार पडले आहे आणि ते दिवसें-

दिवस मोठे होत आहे. असे असले तरी आमचा पिढीजात व्यवसाय, आमच्या कला आम्ही जपल्या आहेत. आमच्या मेंढ्यांना मुलांबाळांप्रमाणे सांभाळत आहोत, पण या धंद्याला भविष्यात टिकवणे अवघड होणार आहे,

## कसं असतं नातं दोघांच..?

कसं असतं नातं दोघांच?
शिंपल्यातल्या मोत्याप्रमाणे
असतं नातं दोघांच
रेशमाच्या अतुट धाग्याने बांधलेलं
असतं नातं दोघांच
दोन जीवांच्या प्रेम बंधनाच्या
सुख दुःखात सहभागी व्हायचं
एकमेकांना आधार देण्याचं
असं असत नातं दोघांच
दोघांचा एक मार्ग ठरवून
दोघांनी त्यावरून जाण्याचा
अडखळत,धडपडत पुढे जाऊन
आपलं ध्येय साधायचं
असं असतं नातं दोघांचं
कधी आनंदानं उमलायचं
कधी रागानं हिरमुसायचं
जीवनातल्या वाईट गोष्टी विसरून
प्रेमाच्या चार गोष्टी बोलून
एकमेकांमध्ये हरवून जाण्याचं
असं असतं नातं दोघांच

**कोमल बाजीराव यादव**
**बी.ए. भाग-२**

## विचारमंथन

स्टॅचू-स्टॅचू खेळता खेळता कळलचं नाही की,
कधी माणसे दगडाची झाली.
कदाचित सेल्फी हे या गोष्टीचे प्रतिक आहे की,
आपण आयुष्यात इतके एकटे झालोय की,
फोटो काढायलासुध्दा आपल्याला
मित्रांची गरज नाही.
मी कुणाला आवडो वा न आवडो दोन्ही गोष्टी
माझ्यासाठी चांगल्याच आहेत
कारण ज्यांना आवडतो त्यांच्या हृदयात आणि
ज्यांना नावडतो त्यांच्या डोक्यांत
कायम राहतो
जर कोणी स्वतःला वाघ समजत असेल,
तर तुम्ही स्वतःला सिंह समजा
त्याशिवाय लढाई रंगात येणार नाही
माणुस स्वतःहून चुकीचा वागत नाही.
परिस्थिती त्याला तसे वागायला भाग पाडते
परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य
ज्याच्याकडे आहे तो जग जिंकण्याची
जिद्द राखून पुढे जातो
स्वतःच्या मनगटावर विश्वास असणाऱ्याला
दुसऱ्याच्या सामर्थ्याची भीती कधीच वाटत नाही
आणि अशा सामर्थ्याला हरवण्याचे धाडस
नियती ही करत नाही.

**प्रियांका दिनेश झेंडे**
**बी.ए. भाग-३**

# दहशतवाद जागतिक समस्या

- नम्रता निळकंठ कुरोलीकर
बी.ए.भाग-३

आपण सर्वजण म्हणतो दहशतवाद हा खूप हानिकारक असतो. पण आपल्याला नेमके माहीत आहे का दहशतवाद म्हणजे काय?तो कोणत्या कारणांमुळे उदभवतो त्याच्यावर उपाय काय आहेत. त्याचे मुख्य ध्येय हे जगात अशांतता प्रस्तापित करणे हेच असते.राजकीय उद्दीष्टये साध्य करण्यासाठी समाजात किंवा त्याच्या एखाद्या स्तरात भिती निर्माण करणे किंवा दहशत निर्माण करणे अशा हिंसात्मक गुन्हेगारीला दहशतवाद असे म्हणतात. २१ मे हा दिवस आपण दहशतवाद म्हणजे विरोधी दिवस म्हणून साजरा करतो. कारण या दिवशी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा मृत्यु तामिळनाडूतील पेरूबंदूर या शहरात दहशतवादी हल्यात झाला.ते मतदान प्रसारासाठी तमिळनाडूतील पेरूबुंदर येथे गेले होते. तेथे त्यांच्यावर श्रीलंकेतील लिट्टे या संघटनेने हल्ला केला. म्हणून त्यांच्या मृत्युदिनाला दहशतवादी विरोधी दिवस म्हणून साजरा केला जातो. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा मृत्युही १९८४ मध्ये खलिस्तानवादी अतिरेक्यांनी केला

भारतातील प्रमुख दहशतवादी संघटना 'पीपल्स वॉर ग्रुप ही आहे'. महाराष्ट्रातील गडचिरोली हा जिल्हा दहशतवादी प्रभावाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.ही संघटना गडचिरोली येथेच कार्यरत आहे. 'अल-कायदा, लष्कर-ए-तयब्बा', 'अल मुजाहिद्दीन, जैश-ए-मुहम्मद', या प्रमुख दहशतवादी संघटनांचे केंद्र असणारा देश हा पाकिस्तानचं आहे. अल-कायदा या संघटनेचा प्रमुख असणारा दहशतवादी ओसामा बिन लादेन हा मुळ सौदी - अरेबिया चा नागरिक होता. पण त्याला पाकिस्तानच्या दहशतवादी संघटनेने आश्रम दिला होता. त्याचा मृत्यु २ ते २०११ रोजी पाकिस्तानमधील इस्लामाबाद पासून ६० मि.मी अंतरावर असलेल्या ओबाटाबाद या शहरात अमेरिकेच्या सैन्यांनी लादेनचा खातमा केला. त्याचा मृतदेह सौदी अरेबियाने न स्विकारल्याने अमेरिकेच्या सैन्यांनी त्याचा मृतदेह समुद्राच्या मधोमध नेऊन तळाशी दफन केला.

ताज हॉटेलमधील घडलेली धक्कादायक घटना आपल्याला माहितच असेल.२६ नोव्हेंबर २००८ रोजी पळाटे ३ वाजता झालेल्या शक्तीशाली बौम्बस्फोटा मुळे हॉटेलच्या ५व्या मजल्यावर आग लागलेली होती. या स्फोटामध्ये आत लपून बसलेले आतंकवादी गुदमरुन लागले ते प्राणांची भीक मागून ओरडू लागले तेव्हा मुंबईतील पोलीसांनी त्यांना अटक केले. इस्माईल आणि कसा हे दोन आतंकबादी त्यावेळी मिळालेले होते. गेल्याच वर्षी कसाब याला मृत्युदंड देणयात आला.

२०१६ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्लयात आपल्या सांगली जिल्हातील नितील सुभाष कोळी हा वीर जवान शहीद झाला. भारताच्या सीमेवर आपल्या संरक्षणावर उभारलेल्या त्या वीर जवानाबद्दल माझ्या मनात खूप आदर आहे. त्यांच्या सारखी किर्ती आपण करू शकलो नाही तरी त्यांची स्मृती तरी आपण केली

पाहिजे.

ऐ मेरे वतन के लोगों
जरा आँखो में भरलो पाणी
जो शहिद हुँए है उनकी
जरा याद करो कुर्बानी

दहशतवाद हा दोन देशातील नसतो तर प्रत्येक शहरात, गांवांगावंत, घरांघरात आढळतो.
दहशतवादाची आंतरराष्ट्रीय कारणे म्हणजे राजनैतिक मार्गाने उद्दीष्ट सध्या होत नसल्याने दहशतवाद आंगिकारला जातो. शत्रु राष्ट्रावर मात करण्यासाठी आर्थिक बल नसल्याने दहशतवाद स्वीकारण्यास सोपा जातो.युध्दासाठी लष्कर वाढविण्यापेक्षा दहशतवादाला पाठींबा देणे सोपे ठरते,वाढते नागरीकरण, शहरीकरण ही मुख्य आंतराष्ट्रीय कारणे आहेत.

या सर्व दहशतवादाचे दुष्परिणाम खालील प्रमाणे होतात. जागतिक तसेच राष्ट्रीय शांतता भंग पावते राष्ट्रीय विकासात अडथळा निर्माण होतो. मारहाणी होते कित्येकांची कुंटुबे उदवस्त होतात.

याच्यावर अनेक उपाय करता येतात पण त्याचा अवलंब प्रत्येकाने केला पाहिजे.ते उपाय म्हणजे मानवतावादी तत्वज्ञानामुळे जागतिक शांतता प्रस्थापित करणे गरजेचे आहे.माणसाची वाईट मानसिकता बदलणे त्याच्यावर चांगले संस्कार रुजविणे गरजेचे आहे. काळा पैसा यावर निर्बंध उपाय करणे यावर आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी नोटाबंदी हा उपाय उदयास आणून सर्व काळ्या पैशाचा नाश केला आहे.आणि खूप मोठा दहशतवाद रोखला आहे.एवढेच नव्हे तर सर्व देशांत मैत्रीचा हात वाढविणे या उपाय योजनेला नरेंद्र मोदी प्रत्येक देशाशी भेट देणे त्यांच्याशी मैत्री करणे आणि त्याच्या बरोबर व्यापार व देवाणघेवाण वाढविण्याचा प्रयत्न सतत करत असतात.

डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी आपल्या भारतासाठी पाहिलेले स्वप्न 'भारत महासत्ता' बनविण्याचे तसेच मिशन २०-२० हे स्वप्न पूर्ण होईल.

"एक पाऊल विश्व मैत्रीकडे......
एक पाऊल दहशतवाद मुक्तते कडे...."

## प्रसिध्द जोड्या....

भांडल्याशिवाय जेवण जात नाही ज्यांना
त्या दोघी म्हणजे -
सासू - सुन
इच्छा नसतानाही चेहरे ऐकमेकांसमोर
ठेवतात हसरे ते दोघे म्हणजे-
जावई-सासरे
बोलणं असतं कमी पण
भांडायला असतात आधीर ते दोघे म्हणजे-
वहिणी - दीर
एकमेकांच्या पराभवात
मानतात आपला जय
त्या दोघी म्हणजे-नणंद - भावजय
एकाच घरात राहूनही
गॅस मात्र वेगळा वेगळा हवा
त्या दोघी म्हणजे-
जावा -जावा
या साऱ्या नात्यामुळे ज्या समस्या
निर्माण होतात त्या समस्या सामंजस्याने
हाताळणारे ते दोघे म्हणजे
यशस्वी-पती-पत्नी

**ऋतुजा दिलीप पवार**
**बी.ए. भाग-१**

# हरवलेली नाती

-प्रियांका दिनेश झेंडे
बी.ए.भाग-३(भूगोल)

आजच्या काळात प्रत्येक जण इंटरनेटवरून व्हॉट्सअॅप, याहू, सारखे वेगवेगळे अॅप डाऊनलोड करून घेत आहेत, आणि यामुळे असं वाटतं की नाती कुठ तर हरवत चालली आहेत. कारण मुलं मुली घरात बसतात खरी पण मोबाईल मध्ये चॅटिंग करत. घरातील नातेवाईकां बरोबर त्यांच बोलणं होतच नाही. घराबाहेर गेल्यानंतर स्मार्ट फोन हातात असतोच पण घरात आल्यावर तर
घरातील मंडळींना वेळ देण्यासाठी तो फोन बाजूला ठेवू शकत नाहीत आणि यामुळच नाती हरवत आहेत असं दिसतयं.

या स्मार्ट फोनमुळ काही नाती तर कायमची गमावत आहेत असं दिसतयं. कारण अलीकड आपल्याकडे एक नविन प्रथाच चालू झाली आहे सेल्फी काढून डी.पी. ठेवायची या सेल्फीमुळ किती तर जणाचे प्राण गेले आहेत. मुल बाहेर डोंगरावरती फिरायला जातात आणि सेल्फी काढतात सेल्फी काढू देत की, पण काढण्याच ठिकाण कोणत ?
डोंगराचा कडा या कड्यांवरती जाऊन सेल्फी काढतात आणि कायमचा जीव गमावतात. अशी सेल्फी कडयावरती का काढतात. कडा सोडून दुसरीकडे सेल्फी निघत नाही का ?

अलिकडे शहरात वायफायच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत एखाद्या मुलाला सहज विचारल की तु त्या शहरात त्या कॉलेजवर का अॅडमिशन घेतलतं तर ती सरळ उत्तर देतात त्या शहरात वायफाय आहे ना. वायफायच्या नावाखाली का होईना मुलं कॉलेजमध्ये जायला तर लागलीत. नाहीतर कॉलेज चालू झाल्यावर नव्याचे नऊ दिवस करायला जातात आणि नंतर परिक्षेलाच वर्गाचं तोंड बघतात.ही झाली आपल्या खेड्याकडची स्थिती मग शहरा कडची तर पहायलाच नको आपल्या कडे मुल-मुली तर फोन वा व्हॉटस् अॅप वर चॉटिंग करतात पण शहरात त्याचे आई-वडील ही या मध्ये सामील असतात. मग काय कोणती नाती आणि कुठली गोती सदानकदा इंटरनेट वरच्या बाता या शहरांमध्ये तर सुनांना फोनवर चॅटिंग करायला वेळ असतो पण सासू-सासऱ्याचा चष्मा शोधून द्यायला वेळ नसतो. मग पेपरच्या बातम्या वाचून दाखवणे लांबच राहील. आणि या वृध्दांची सेवा करण्यापेक्षा यांना वृध्दाश्रमात ठेवणं पसंत करतात. आणि ही नाती तोडतात.मान्य आहे की,आज आपण एकविसाव्या शतकात वावरतो पण कोणी असे म्हणटले नाही की आपण आपली प्रगती करा आणि नाती तोडा इंटरनेटचा वापर अवश्य करा नवनविन तंत्रज्ञान शिका पण नाती तोडून नको करण हीच नाती सुख आणि दुःखात आपणाला मदत करतात, इंटरनेटमुळ तर संपुर्ण जग एकत्र आलयं, शहरात लांब प्रवास करायचा असेल तर आपण

घरबसल्या तिकीट बुकिंग करू शकतो इतकी प्रगती या तंत्रज्ञानामुळ झालेली आहे.व्हॉटस् ॲप वापरा मित्र मैत्रिणी जोडा,गप्पा मारा, पण आपली जवळची नाती दुरावतील इतके पण स्वतःला त्यात गुंतवू देऊ नका नाहीतर नंतर म्हणावं लागेल नाती ही ओंजळीत भरलेल्या पाण्यासारखी असतात नकळत ओंजळ रिकामी होते आणि उरतो फक्त ओलावा प्रत्येक आठवणींचा

आठवणी बरोबरच नाती जपलीत तर ती जास्त काळ तुमच्या आयुष्यात सुख दुःखात साथ देतील

---

## कोणाच्या डोळ्यांत काय दिसते

सैनिकांच्या डोळ्यांत बलिदान दिसते.
गरिबांच्या डोळ्यांत करूणा दिसते.
गुरूजनांच्या डोळ्यांत ज्ञान दिसते.
मित्रांच्या डोळ्यांत मदत दिसते.
बहिणीच्या डोळ्यांत प्रेम दिसते.
संताच्या डोळ्यांत निःस्पृहता दिसते.
श्रीमंताच्या डोळ्यांत गर्व दिसते.
कवीच्या डोळ्यांत कल्पना दिसते.
मातेच्या डोळ्यांत वात्सल्य दिसते.
वडिलांच्या डोळ्यांत कर्तव्य दिसते.

मोनिका राजेंद्र गायकवाड
बी.ए. भाग-१

## आई

आई म्हणजे पणती
अखंड तेवणारी ज्योती
आई म्हणजे कुंती
दुःख सोसणारी शक्ती
आई म्हणजे दाती
सहवासात तिच्या कशाचीच नसते भ्रांती
आई म्हणजे त्याग आणि प्रीती
भावनांची जोडणारी नाती
आई म्हणजे एक परिपूर्ण व्यक्ती
विश्व सामावलेली मुर्ती
तिचे चरण स्पर्श करताना
व्हावे तिथेच मुठभर माती

मयुरी तानाजी घनवट
बी.ए. भाग-१



# जीवन सुंदर आहे....

-सारिका कृष्णा सलगर
बी.ए. भाग-१

जीवन ही एक अजब किंवा अनोखी दुनिया आहे जीवन जगत असताना मनुष्य हा नेहमीच स्वतः आनंदी राहतो. त्याचबरोबर दुसऱ्याला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न तो नेहमीच करत असतो, आपल्या ह्या २१ व्या शतकात थोडीफारच मंडळी या प्रवृत्तीची असतात. तसेच या शतकात काही माणसे आपल्या सोयीसाठी दुसऱ्याला संकटात टाकतात. त्यांच आयुष्य उधद्वस्त करतात, काही माणसे असे मानतात की, स्वतःसाठी न जगता दुसऱ्यासाठी जगले पाहीजे. माणसांने माणसासारखे जगण्यातच खरी माणुसकी असते, मी अशी कित्येक माणसे पाहीली आहेत की, जी तावातावाने आपले कामे करीत असताना त्यांच्या जीवनामध्ये एकच हेतू असतो. तो म्हणजे सारे जग बदलण्याची जबाबदारी ही माणसे सदानकदा पाठीवर ओझे वाहत असतात. हे जीवन जगत असताना त्यांना गंभीर चेहरा करून ओझे रेटावे लागते. आपल्या या जीवन जगण्याच्या कार्यात हे लोक इतके गर्क असतात की, साध्यासुध्या आनंदाचे क्षण त्यांच्या कधीच प्रत्ययाला येत नाही. माणसाला जीवन जगत असताना बऱ्याच अडचणीतुन जावे लागते. प्रत्येक माणूस हा स्वार्थी नसतो.

"माणसाचा जन्म हा प्रत्येक
घराघरात होतो परंतु माणुसकी
ही ठराविक ठिकाणीच जन्म घेत असते व
जिथे माणुसकी जन्म घेते
तिथे परमेश्वराचे वास्तव असते "

हे खरंच आहे. प्रत्येक माणूस जीवन जगत असताना बऱ्यास गोष्टींची तडजोड करत असतो. काही माणसे स्वतःच्या हव्यासापोटी कोणत्याही थराला जातात.जीवन जगणे खूप अवघड असते. प्रत्येकाला जीवनामध्ये सुखा बरोबर दुःखालाही तोंड द्यावे लागते. एखाद्या वेलीवरचे फुल हे नेहमीच उन्हामध्ये, पावसामध्ये,त्याचबरोबर वादळातही या सर्वांना संघर्ष देत टवटवीत फुललेले असून ते आपल्याला सुखावत असते. ते आपल्याला नेहमीच आनंदी राहण्याचा संदेश देत असते या फुलाप्रमाणे आपणही आपल्या जीवनामध्ये स्वतः आनंदी असले पाहिजे, त्याच बरोबर दुसऱ्याला ही आनंद दिला पाहिजे.

आपल्या खडतर जीवनात आपण काही वेळा पूर्णपणे खचलेलो असतो.पण आपल्या समोर असा काही प्रसंग घडतो की तो आपल्याला जगण्याची नवीन उमेद देऊन जातो, आपल्याला जगण्याचा मार्ग दाखवून जाते. जीवनात जगत असताना दुसरे काही म्हणतात याच्याकडे लक्ष देऊ नका. माणूस चांगला इतकाच वाईट आहे. काही माणसे ही दुसऱ्याच्या आयुष्यात ढवळाढवळ करत असतात. त्यांची चूक ही वेळ निघून गेल्यावर कळते, जीवनात प्रत्येकाच्या वाट्याला चढ-उतार हे नेहमीच असतात.

कुठल्याशा एका चिमणीच गोष्ट आहे, एकदा वादळ

आले असता जग कोसळू नये म्हणून मी चिमणी दिवसभर ते झाड घट्ट धरून बसली होती.त्या चिमणीप्रमाणे प्रत्येक मनुष्याने जीवन चांगल्या रीतीने जगण्याचा प्रयत्न केला पाहीजे माझा सगळ्यांना एक संदेश आहे प्रत्येक माणुस हा आयुष्यात चुकत असतो.पण तीच चुक आयुष्यात वारंवार करू नका. एखाद्या चुकीसाठी आपलं आयुष्य गमवू नका, त्या समस्ये मधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करा. माणूस हा घातक असतो. एखाद्या माणसावर पटकन विश्वास ठेवू नका. आपले जीवन चारआणे–आठाआणे इतके स्वस्त आहे का? कोणतेही संकट आले की,आपण ते संपवण्याचा विचार करतो. जीवन जगत असताना प्रत्येक मनुष्याने कोणतेही ध्येय मनात ठेऊन जीवन जगले पाहिजे. कोणतीही व्यक्ती आपल्याबरोबर चांगली वागेल असं नसतं कोणतेही संकट आले किंवा दडपण आले तर आपण खचून न जाता उमेदीनं जगले पाहिजे,पुढचा आपल्या बरोबर वाईट वागतो म्हणून आपणं त्याच्याबरोबर वाईट वागणे गरजेचे नाही.कोणीतरी म्हंटलेच आहे की,

"या जगण्यावर शतदा प्रेम करावे "

एखाद्या व्यक्तीची नेहमीच जीवनामध्ये जिंकण्याची प्रवृत्ती असते. परंतु त्यांनी एकदा तरी हरण्याची प्रवृत्ती आपल्यामध्ये निर्माण केली पाहिजे.

"दुःखाची दरी ओलांडल्या शिवाय
सुखाची हिरवळ दिसणार नाही".

गरीब मनुष्याबरोबरच श्रीमंताला ही दुःख ही असतात, पण ते खचून न जाता उमेदीने पुन्हा उभे राहतात व आपल्या जीवन जगण्याचा गाडा हा पुढे ढकलत राहतात .

माणुस कसा दिसतो त्या पेक्षा तो मनाने कसा आहे याला महत्व द्या..कारण शेवटी सौंदर्याचं आयुष्य तारूण्यापर्यंत असत....तर गुणांच आयुष्य, मरणापर्यंत असतं....जीवनात माणसाचं नांव हे त्याच्या कर्तुत्वाने मोठं होते सद्गुरू वामनराव पै यांनी म्हटले आहे, 'तुच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' जीवनात चांगल्या माणसांची संगत धरा. माणसाने चांगले जीवन जगण्यासाठी चांगल्या गुणांची जोपासना केली पाहिजे. जसे माणसांचे विचार तसा प्रवृत्तीचा माणुस घडत असतो. आपले जीवन हे नेहमीच आनंदी व सुंदर असेल पाहिजे. जीवनात प्रत्येक मनुष्याने काही ना काहीतर होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या जीवनात आपले विचार चांगले ठेवले पाहिजे. जीवनात दूःख हे येतचं असते पण त्याचा त्रास दुसऱ्याला होता कामा नये.

स्वतःसाठी जगण्यापेक्षा दुसऱ्यासाठी जगण्यात जीवन असे म्हटले जाते. आपल्या जीवनात दुसऱ्यालाही आनंद द्या आणि आपलेही जीवन सुंदर बनवा.



# नको हा स्त्री जन्म....

कु.आपुगडे मोनिका रविंद्र
बी.ए. भाग-३

स्त्री ही गृहलक्ष्मी आहे. संसार रथाची चाके म्हणजे स्त्री आणि पुरूष. जिथे स्त्रियांना वंदनीय मानले जाते तेथे लक्ष्मीचे वास्तव असते. प्रत्येक कर्तबगार पुरूषाच्या मागे एक स्त्री असते, अशा कित्येक वचनातुन स्त्री जातीचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला असताना स्त्री मात्र स्वतः म्हणत असते , नको तो स्त्री जन्म! असं का? त्याला कारण म्हणजे स्त्रीला मिळणारी विशेषतः पुरूषाकडून मिळणारी अमानूष वागणूक .

स्त्री वर होणाऱ्या या अन्यायांची जाणीव अनेक महात्म्यांना शेकडो वर्षापूर्वीच झालेली आहे. जोतिबा फुले, आगरकर,महर्षी कर्वे अशी अनेकांनी या अन्यायांना वाचा फोडली. बंधनात अडकलेल्या स्त्रियांना मुक्त करण्यासाठी पराकोटीचे प्रयत्न केले. म्हणूनच स्त्रीची स्थिती आज थोडी सुधारलेली आहे. कायद्यानेच विवाहाचे वय वाढविण्यात आले. म्हणून बालविवाहाला थोडा तरी आळा बसला. महिला विद्यापीठ निघाले. काही प्रमाणात स्त्रिया शिकू लागल्या आणि या शिकलेल्या स्त्रियांनी दाखवून दिले की जीवनाचे कोणतेही क्षेत्र आपल्याला असाध्य नाही पण हे झालं ते फार थोड्या स्त्रियांबाबत बहुसंख्य स्त्रिया आजही अज्ञानाच्या अंधारात चाचपडत आहेत आणि अन्यायाला बळी पडत आहेत.सुशिक्षित स्त्रियांना अन्यायाला तोंड द्यावे लागत नाही असं नाही पण काही प्रमाणात त्या आपल्यावरील अन्यायचा प्रतिकार करू शकतात. किमान त्याला वाचा तरी फोडू शकतात.

वृत्तपत्रातून स्त्रीयांवरील अन्यायाच्या वार्ता रोज प्रसिध्द होत असतात. हुंडाबळी, म्हणून आजवर असंख्य स्त्रिया बळी गेल्या आणि आजही जात आहेत.

"न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति"....

या वचनाच्या संस्काराखाली वाढलेल्या मंडळीना स्त्रीला मन आहे. मत आहे, स्त्री देखील एक माणुस याची आजही जाणीव नाही. अनेक कुंटुबात आज ही स्त्रीचे मत विचार घेतले जात नाही. तिला चूल आणि मुल एवढेच करायचे असते. आजही खेड्यातून नव्हे तर शहरातूनही स्त्रीही चार भिंतीच्या आत आपले जीवन जगत असते. पतीचे मत हेच तिचे मत ठरते, पतीच्या इच्छेनुसार तिला वागावेच लागते आणि कित्येकदा ती पतीच्या प्रतिष्ठेची केवळ एक शोभेची बाहुली ठरते.

आज सुशिक्षित,अशिक्षित बहुतेक सर्व स्त्रिया नोकरी वा कष्टांची कामे करून धनार्जन करतात म्हणून काही त्यांची इतर कामे, कष्ट कमी करण्याचा कुणी विचारच करीत नाही. आजही सुशिक्षित स्त्री घरातील कामे करते.,कचेरीतील महत्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळते, सुशिक्षित असल्यामुळे बँका तील वगैरे बाहेरची सर्व तऱ्हेची कामे पार पाडते

आणि पालक म्हणून मुलांच्या अभ्यासाची थोडी फार जबाबदारी उचलते. एकाच वेळी एवढी कामे करीत असताना ती थकून जाते. तिची दमछाक होते. तेव्हा तिच्या तोंडून सजगत्या उद्गार बाहेर पडतात– नको हा स्त्री जन्म,त्याचवेळी तिचा जोडीदार कुठेही आरामात चैनी विलासी व्यसनात रमलेला असतो. त्या प्रसंगी तिला मारझोड ही करतो
काम न करणारे हे अनेक बेकार पती पत्नीला कष्टाची कामे करण्यास भाग पाडतात.

आजच्या स्त्रीने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून लढून स्वतःसाठी प्रगतीची प्रत्येक दालने खुली करून घेतली आहेत. तरी ही वंशाला मुलगाच हवा म्हणून गरोदर स्त्रीला तिच्या मनाविरूध्द मुलीचा गर्भपात करण्यास भाग पाडले जाते.. ही परिस्थिती आज सर्वत्रच दिसून येते की स्त्रियांना समान कामात समान वेतन मिळत नाही आणि शिवाय संरक्षणाची हमी नसते तेव्हा स्वतःच्या मताला स्थान नसणारी ही स्त्री दुबळेपणाने म्हणून जाते नको हा स्त्री जन्म..........



# विसरलो आहे

घरात टी.व्ही आल्यापासून आपण,
बोलणं विसरलो आहे.
दारात गाडी आल्यापासून आपण,
चालणं विसरलो आहे.
आपल्याकडे कॅल्युलेटर आल्यापासून आपण,
पाढे म्हणने विसरलो आहे.
रस्त्यावर डांबर आल्यापासून आपण,
मातीचा वास विसरलो आहे.
मनाला इतके श्रम होतात ,
शरीराचे कष्ट विसरलो आहे.
कृत्रिम सेंटच्या वासामुळे आपण,
फुलांचा सुगंध विसरलो आहे.
फास्ट फुडच्या जमान्यात आपण,
तृप्तीची ढेकर विसरलो आहे.
क्षणभंगुर मृगजळामागे धावताना आपण,
सत्कर्मातला आनंद विसरलो आहे.
आपलीच गरज भागवताना आपण,
दुसऱ्यांचा विचार विसरलो आहे.
सतत धावत असताना आपण,
सुखानं झोपही विसरलो आहे,
हसणं विसरल्याने जीवन.
जगणं विसरलो आहे.

पुजा वसंत पाटील
बी.ए. भाग-३

# संत साहित्याची गरज....

– ज्योती कुमार कोळी
एम.ए. भाग–१

"बहु असोत सुंदर संपन्न की महा" "प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा....."

हे महाराष्ट्र राज्याचे वर्णन सार्थ ठरणारे आहे. सुजलाम सुफलाम असणारी ही भूमी संताची, कवींची,लेखकांची आणि वीरांची देखील आहे. आपल्या या भूमीला संताची परंपरा लाभली असून ही परंपरा आपल्या संस्कृतीचे वैभव आहे,तर त्यांचे साहित्य,ग्रंथ हे आपल्या संस्कृतीचा चिरंतन ठेवा आहे,. येथे संत वाङ्.मया वर पुष्कळ वाङ्ःमय तयार झाले आहे. साहित्यीकांनी, विचारवंतानी. समिक्षकांनी संतांच्या ग्रंथांना आपल्या बुद्धीच्या कवेत घेण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला पण आकाशा एवढ्या विशाल अंःतकरणाचे संत आणि तेवढ्याच उंचीचे त्यांचे वाङ्ःमय यांचे महत्व सिद्ध झालेले असताना देखील आजच्या २१ व्या शतकात हे संत साहित्य हरवलेलं असून त्याला दुय्यम स्थान दिलं जात आहे.

संत ज्ञानेश्वरांच्या ओव्यापासून ते संत कबीरांच्या दोह्यापर्यंत आणि तुकोबांच्या गाथेपासून समर्थ रामदासांच्या दासबोधापर्यंत संतांच्या प्रत्येक ग्रंथाने भक्तांना समोरचा मनुष्य कितीही निरईश्वरवादी असला तरीही त्याच्यामध्ये ईश्वर पहायला शिकवले.

हे विश्वची माझे घर... या भव्य आणि उदात्त भावनेने सर्व भौगोलिक सीमा ओलांडणारे संताचे तत्वज्ञान माणसावर प्रेम करायला शिकवते माणसांत ईश्वर पाहायला शिकवते, आणि ईश्वरात 'निष्ठांची मांदीयाळी '–असे आपल्याला संबोधून आपला व पर्यायाने मानवाचा गौरव केला आहे. आज औद्योगिक विकासावर आधारलेल्या समाजाने, भांडवलशाहीने विलासी जीवन हे प्रयोजन मानले आहे. जीवनाचा सर्वस्वी आनंद इंद्रीयांची तृप्ती करणे हा मनुष्याचा स्वभाव बनला आहे. गाडी, बंगला, ऐशोराम,भरपूर बँक बॅलन्स्,दागिने अशी संपत्ती ज्याच्याकडे आहे तो गुणाने कसाही असला तरीही आजच्या समाजात प्रतिष्ठीत समजला जातो.आणि याच समाजात संत आणि त्यांचे सहित्य हरवलेले आहे. या पार्श्वभूमीवर संतांनी मानवाला परमार्थ सांगितला आहे.

संत म्हणे, भाबड्या भाविकांची माऊली, संतांची ग्रंथावली म्हणजे विशाल वृक्षाची सावली आहे. या सवालीत कोठेही विसावा घेऊ शकतो. टाळ–मृदूंगांच्या तालावर देहभान विसरून विठ्ठल नामाचा गजर करून जीवनाचा आनंद लुटू शकतो.वास्तविक ज्ञानेश्वरांनी अखंड मानवतेला ज्ञान देणारी ज्ञानेश्वरी लिहली,रामदासांनी दासबोध तर तुकोबांनी गाथा लिहली,. ज्ञानदेव निवृत्तीनाथ सोपानदेव,मुक्ताबाई यांना समाजाने छळले तरी देखील संत साहित्यांचे मंदिर उभारतांना रामदासांनी पाया घातला, ज्ञानश्वरांनी भिंती उभारल्या, नामदेव पायरी

बनले,मुक्ताबाईनीं आपल्या ओव्यांनी शिखरांची रचना केली. तर तुकोबा कळस झाले.आणि याच मंदिरावर आपल्या सभ्य संस्कृतीचा ध्वज आजच्या तरूण पिढीला फडकवायचा आहे.

संतानी भोंदूगिरी,जादूटोणे,अंधश्रध्दा या सर्वा पासून समाजाला दूर ठेवून आधुनिकते कडे नेण्याचा व एक नविन विचारांचा समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच खऱ्या अर्थाने आज शिकले ल्या सुशिक्षित समाजाला संत साहित्याच्या अभ्यासाची गरज आहे.

---

## माझं म्हणायचं असत....

माझं फक्त म्हणायचं असते
शेवटी कोणी ही कोणाचं नसतं
नातं फक्त आपलं असते
तेच शेवटी मनाला जाळतं
आयुष्यात प्रेम करायचं असतं
मिलन शेवटी नशिबी नसतं
त्यात आपलं काहीचं नसतं
माझं माझं म्हणायचं असतं
कर्ता करवता वेगळाच असतो
जीवनात मिळवून गमवायचं असतं
तेच शेवटी परकं असतं
वेळेला कोणी थांबत नसतं
माझं माझं म्हणायचं असतं
येताना कोणी काही आणत नसतं
येवू तसं जायचं असतं
या पलिकडे काहीच नसतं
माझं माझं म्हणायचं असतं

कोमल बाजीराव यादव
बी.ए.भाग-२

## एक तरी मुलगी असावी

एक तरी मुलगी असावी
उमलताना बघावी
नाजूक नखरे करताना
न्याहाळायला मिळावी
एक तरी मुलगी असावी
साजरी गोजरी दिसावी
नाना मागण्या पुरवताना
ताराबंळ माझी उडावी
एकतरी मुलगी असावी
मॅचिंग करताना बघावी
नटता नटता आईला तिने
नात्यातील गंमत शिकवावी
एक तरी मुलगी असावी
मनातली गुपित तिने
हळूच कानात सांगावे
एक तरी मुलगी असावी
गालातल्या गालात हसावी
कधी तरी भावनेच्या भरात
गळा मिठी घालावी
एक तरी मुलगी असावी
निदान सुनेच्या रूपात मिळावी
लेकीची कसर तिने
थोडी भरून काढावी

नम्रता बजरंग मोहिते
बी.ए.भाग-३ (भूगोल)

# आम्ही मराठी....

- पुजा वसंत पाटील
बी.ए. भाग-३

आम्ही मराठी म्हटलं की,आपल्या मनात आपली मायभूमी, मराठी लोक, मातृभाषा मराठी विषयीच्या संकल्पना येतील.मानवी जीवनात जन्मभूमी आणि कर्मभूमी या दोन गोष्टी खूप महत्वाच्या असतात.म्हणून तर महाराष्ट्रासारख्या पवित्र साधुसंतांच्या आणि शुरवीरांच्या भुमीत जन्माला आल्याचा आणि मराठी मातृभाषा असल्याचा मला खूप स्वाभिमान वाटतो हो. खरोखरंच आम्ही आमचं सर्वस्व मराठी मानतो. आणि मराठीच्या या अभिमानाबरोबर प्रत्येकाच्या डोळ्यासमोर मराठीचं हे अभिमान गीत येतं.

"लाभेल आम्हास भाग्य बोलतो मराठी,
जाहले खरेच धन्य ऐकतो मराठी,
धर्म,पंत,जात,एक जाणतो मराठी,
एवढ्या जगात माय मानतो मराठी"

आपल्या पायाला काटा टोचला की तोंडून "आई गं" असा उद्‌गार निघतो. समोर साप आला तर लगेच "बाप रें"असे शब्द पटकन तोंडातून निघतात .मनातील भावना सहजपणे बाहेर पडतात त्या माय बोलीतूनच. म्हणूनच माता मातृदेश याप्रमाणे मातृभाषाही वंदनीय आहे.

मराठी साहित्य विश्व खुप मोठे आहे, आपली ही परंपरा आजतागायत मराठीने जपली आहे मराठीबद्दल सांगायचे झाले तर ज्ञानेश्वरां पासून अनेक संतांनी मराठीमधून काव्य,अंभग, ओवी,यांची रचना केली व मराठी भाषेचा झेंडा त्रिलौक्यात फडकविला, काळाच्या ओघात अनेक परकीय भाषेची आक्रमणे मराठी भाषेवर झाली परंतु इतर भाषेला न जुमानता मराठीने स्वतःचे अस्तित्व ही टिकवले आहे.ज्ञानेश्वरांनी मराठीबद्दल लिहले आहे

"माझ्या मराठीची बोलू कौतुके
परि अमृतातेही पैजा जिंके...
ऐसी अक्षरे रसिके मिळविन"

महाराष्ट्रात मराठी भाषेबद्दल एक वेगळं असं मत निर्माण झालंय आज विविध क्षेत्रामध्ये मराठी माणूस म्हटल्याबरोबर एक वेगळीच शंका निर्माण करतात. आज मराठी माणसा-माणसांतच भांडण करत आहेत कारण त्यांना माहिती आहे की,जर,समजा मराठी माणूस एकत्र आला तर तो महाराष्ट्रातच काय तर संपूर्ण जगाचाही कायापालट करू शकतो. तसेच इतरांना काय वाटेल कोण काय म्हणेल असा विचार करणे म्हणजे 'भित्यापोठी ब्रम्हराक्षस ' हे विसरता कामा नये आणि आपण आपल्याला जे वाटेल तेच करावे, असं म्हणतात ना," ऐकावे जनाचे करावे मनाचे ' या बाण्याने आपण मराठी भाषेतच सर्व लिखाण केले पाहिजे, आणि मराठीतच बोलले पाहिजे, कोणी काय बोलेले तर,असा विचार करायचा नाही ' हसतील त्याचे दात दिसतील', असे म्हणतात ना की, फालतू टीकेला भीक न घालणेच बरे.

म्हणूनच मराठी माणसाने मराठीपण सोडून

चालणार नाही. शिवाय आपण छत्रपती शिवाजी महाराजांनी घडविलेल्या महाराष्ट्रात आपण जगत आहोत हे आपले फार मोठे भाग्यचं आहे. मराठी मायभूमी तुन मोठ्या झालेल्या माणसांबद्दल सांगायचे झाले तर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक मराठीच होते.ज्या चित्रपटसृष्टी मध्ये मराठी माणसाला कमी लेखलं जातं त्याच चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके हे सुध्दा मराठीचं होते, क्रिक्रेटचा देव मानले जाणारे सचिन तेंडुलकर हे सुध्दा मराठीच आहेत. ऑलम्पिक मध्ये भारताला पहिल्यांदा पदक मिळवून देणारे खशाबा जाधव आणि गानकोकीळा भारतरत्न लता मंगेशकर या पण मराठीच आहेत.

महाराष्ट्र ही मराठी संताची भूमी आहे. महाराष्ट्र ही स्वराज्यासाठी लढलेल्या, शिवराय व त्यांच्या मावळ्यांची भूमी आहे.महाराष्ट्र ही शेतक ऱ्यांची, गरिबींची,प्रत्येक मराठी माणसाची भूमी आहे,आज मनात एक प्रकारची खंत निर्माण झाली आहे.की मराठी माणसाचा,मराठी बाणा कुठे तरी लोप पावताना दिसत आहे.आणि अन्याय होताना दिसत आहे व अन्याय थांबवण्याचे सामर्थ्य ही मराठी माणसांतच आहे.मराठी माणसांनीच या अन्याया विरोधात आवाज उठवला पाहिजे. तरच "आम्ही मराठी" असल्याचा सार्थ अभिमान आपल्याला जाणवेल.

"आम्ही मराठी आहोत आणि मराठीच राहणार"मराठी माणसाचे मातृभाषेवर अपार प्रेम आहे. मराठी गरीब जनतेबद्दल मला सहानुभुती वाटते. आज्ञाधारक व स्वातंत्र्यप्रिय महाराष्ट्राच्या बाबतीत दिल्ली पहिल्यापासून आज्ञाधारक राहिली तर महाराष्ट्र स्वातंत्रप्रिय, शिवाजी महाराजांनी या मराठी मुलखाला व सर्व देशाला स्वातंत्र्याचा 'स्वराज्यमंत्र' सर्वप्रथम दिला तो सर्वप्रथम स्वतः अंमलात आणून युक्ती शक्तीन स्वराज्य निर्माण केलं आज्ञाधारक दिल्ली आणि स्वातंत्र्य स्वराज्य प्रिय शिवाजी महाराज यांच्यात तेव्हा जो संघर्ष सुरू झाला होता.तो पुढील काळात आणि आजपर्यंत कमी जास्त प्रमाणात सुरूच आहे. मात्र शिवाजी महाराजांनीच शिकवला आम्हाला निर्धार साहस,स्वाभिमान,गनिमी कावा आणि त्यातील बारकावा ज्यांच्या युद्धनितीचा अभ्यास जगाला करावासा वाटला ज्यांच्या लढ्याचा डंका जगभर निनादला.ते शिवराय महाराष्ट्राची आणि देशाची आद्य प्रेरणा आहेत.

मराठी प्रांतीय माणसे संमिश्र स्वभावाची आहे त्यात संभाजी महाराजांचा आक्रमकपणा तर शिवाजी महाराजांची निती आहे.लोकमान्य टिळक व वि.दा.सावरकर क्रांतीकारक आहेत.आंबेडकर यांची समर्थनीय बंडखोरी आहे.तर यशवंतराव चव्हाण यांचा नेमस्तपणा आहे त्यात ज्ञानेश्वरांच्या अध्यात्माची लेखणी,रामदासांचे वैराग्य आहे,तुकारामांचा विद्रोह आहे तर विनोबांची विद्वत्ती आहे. असा प्रदीर्घ राजकीय,सामाजिक, सांस्कृतिक साहित्यिक वारसा लाभलेला महाराष्ट्रातील मराठी माणूस स्वाभिमानी व श्रेष्ठ असणार हे उघडच आहे. जर्मन कवी गटे म्हणतो की, श्रेष्ठांना शत्रु फार कमी असतात आणि त्याच प्रमाणे हेही महाराष्ट्राच्या बाबतीत खरे आहे.त्यामुळे महाराष्ट्रा बद्दल इतरांची मतं कधी संशयाची असतात तर कधी आकसाची महाराष्ट्रीय माणसाचा सन्मान केला गेला नाही तर चालेल ;पण मराठी माणसांचा अवमान झालेला त्याला चालणांर नाही. कारण

महाराष्ट्रातील मराठी जनतेला पांगळे करून तुम्ही भारतात धावायला शिकवू शकत नाही. कारण सेनापती बापट यांनी म्हटल्या प्रमाणे

"महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले
मराठ्यांविना राष्ट्रगाडा चाले
खरा वीर वैरी पराधिनतेचा,
महाराष्ट्र आधार ह्या भारताचा"

पूर्वीच्या काळी कोणत्याही सुविधा नसताना शिवाजी महाराजां सारख्या थोर व्यक्तींनी क्रांती घडवून दाखविली मात्र आज आपल्याकडं अनेक अत्याधुनिक सोई सुविधा असताना देखील आपण भारतीय जवळ जवळ सर्व क्षेत्रामध्ये मागे पडताना दिसतो आहोत.आणि मग जर असं सर्व विदारक चित्र असेल तर खऱ्या अर्थाने माझा भारत महा बलशाली किंवा महासत्ता बनेल का? असा एक प्रंचड दडपण आणणारा प्रश्न माझासारख्या अनेकांना हैराण करून सोडतो.

जेव्हा मी आपल्या युवकांचा, नवतरूणांचा किंवा तरूणाईचा विचार करते तेव्हा, खरंच आज आपल्या आजुबाजुला अनेक नवविचार घेऊन मातृभूमीसाठी काही करण्यासाठी,एक नव,चैतन्य निर्माण करणारी पिढी जन्म घेताना दिसत आहे. ज्ञानेश्वरांनी वयाच्या १६ व्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहली. त्याचप्रमाणे वयाच्या १५व्या वर्षी संगणका साठी लागणारी कार्यप्रणाली लिहणारी मुलेही याच धरणीमाते वर आज आहेत

अस म्हणतात ना की, जरी एखाद्या गोष्टीची एक बाजू चकचकीत असली तर डाग असणारी दुसरी बाजू नक्कीच असते. खरंतर अशी उच्च दर्जाची विचारसरणी असणारी पिढी आज या महाराष्ट्रात पर्यायाने देशात आहे.होती मराठी मायभूमी,मराठी माणसे याच्याबद्दल जेवढं सांगांव तितकं कमीच आहे. म्हणूनच मराठी माणसांबद्दल त्यांच्या असणाऱ्या माणुसकीबद्दल असं म्हणावसं वाटतं...

"मराठी माणसातील माणुसकी
फक्त मराठी माणसातच दिसली
शब्दांना जागणारी मराठी माणसे
फक्त आदर्श नि आदर्शच दिसली"

---

## म्हणी :- नोटा बंदीच्या....

* खात्यावर पैसा ATM ला वळसा
* बँकेत नाही तर ATM मध्ये कोठून येणार
* नकटीच्या लग्नाला नोटबंदीचे विघ्न
* पैसे थोडे रांगा फार
* दुकानदार उधारीला राजी
* सासू ATM वर सून PAYTM वर
* बँकवाल्याचे घर असावे शेजारी
* व्यवहाराला १०,२० रू. च्या नोटांचा आधार
* आडला हरी बँकवाल्याचे पाय धरी
* कॅश लेस व्यवहाराला नोटा कशाला
* उधारीच्या व्यवहाराला नविन नोटा कशाला
* घरोघरी दोन हजारांच्या नोटा
* नोटा उगळाव्या तितक्या गुलाबी
* चार दिवस उधारीचे चार दिवस उपवासाचे

ऋतुजा दिलीप पवार
बी.ए. भाग-१

# ईलिक्षण...

– घेरडे अमोल बाळू
बी.ए. भाग–२

आहो इथुन तरी दर आर्ध्या तासाला आष्ट्याला जायला बस आहे म्हटले काका आणि मी इथं येवून एक तास झाला पन एक वडाप नाही मग बस तर लांबच. असे रवी काकुळतीला येवून बोलला.

तसा रव्या माझ्या कधी बघण्यातला सुध्दा नव्हता पण मीही त्याच्या या शब्दांना दुजोरा दिला. म्हटलं आर तुला तरी काही घाई नसलं पण मला तर लगा क्लास ला जायचं आणि क्लास तर सुरू हुन अर्धा तास झाला.

अशी गाडीची वाट बघणारी आम्ही दोघचं नव्हतो तर मायंदाळं माणसं व्हुती. मग काय हो सर्वाचा कालवा सुरू सर्वजण आपापली म्हणणं बोलू लागली. मी मनालाच म्हटलं आज ही स्टॅड वर गर्दी कशी काय? कायतर मोठा कार्यक्रम हाय काय की,तर थोड्या वेळान कळले की आज गावात ईलिक्षण हाय.

मला तर काय माहीत गावातल या गावात रहायला येवून फकस्त १ वरीस २ महिनं तर झाले होतं. मला काय वो गावात कधी काय कार्यक्रम असतात ही माहीतीच नव्हत. मग मी पण फक्त त्या गर्दीकडे पाहतच राहिलो. गावातल स्टॅड कसल वो,चार खांब उभा केलेलं नि वरती पत्रे मारलेलं अन् बसायला सिमेंटने बांधून एकच लांबलचक बाकडा मोठी होता. पणते स्टॅड जरा अडगळीत होत. ना गाडी आलेली दिसत होती ना गेलेली. म्हणून काय चारच ती माणसे स्टॅड मधी असायची. नायतर सगळी माणसं मयताला गेले सारखी रस्त्यावरच ओळीनं उभ राहायची असं दररोज होत. मी कॉलेजला जाताना दररोज बघायचो.गावाची लोकसंख्या भरपूर पण गावात दोन पार्ट्या म्हटंल की, गावाची सुधारणा लांबच राहते. फक्त प्रश्न उरतो तो पैशाचा थोड्या वेळान कळलं की विलिक्षण हाय पण कशाच तर... सोसायटीच गावात दोन पार्ट्या असतील तर ईलिक्षण घ्यायला लागतं नाहीतर बिनविरोधी निवड झाली असती की, पूर्ण पत्ता काढल्यावर कळलं की आम्ही राहतो ती जागा माळ्यांची आहे. ते खूप माठी पार्टी हाय. तिच्या विरूध्द गावात दुसरी पवारांची पार्टी हाय मग मला पण न कळत वाटू लागलं की माळ्याची पार्टी निवडून यावी,करण त्याची खावी भाकरी त्याची करावी चाकरी.त्यांच्या जागेवर राहतो म्हटल्यावर त्यांच्याबाजूने बोलायला पाहिजे.तसं काय मला राजकारण काय माहीत नाही पण जसं "शिवाजी महाराज की" म्हटल्यावर आपसुकच "जय" तोंडून निघतं त्यापध्दतीने मीही म्हटले माळी निवडून यायला पाहीजे लगा. मग काय मनाने पण गोष्टीला दुजोरा दिला

पण लगेचच या विचारांतून बाहेर निघालो

कारण नवीनच काहीतरी घडलं होत. ते म्हणजे जशी आपण खूप वेळ आकाशाकडे बघत रहाव नी नशिबाने एखाद्या तारा त्या क्षणी तुटावा काहीतर खुळचट मागावे.असंच कुठल्यातरी विचारात असताना एका अनोळखी मुलीच्या नजरेलामिळवी. तसी माझी नजर मिळाली मग मनात म्हटलं आता अजुन एक तास बस नाय आली तर काय बरं होईल.इथच आता लेक्चर समजायचं.पावसाची चाहूल लागताच जशी कोकीळा गायला सुरू करते तसच माझ झालं होत जस मी मनात गाण म्हणू लागलो की,दिस जातील दिस येतील भोग सरलं,सुख येईल.. अशाच पहिल्याच नजरेत आवडली ती आपल्याला मग काय सोसायटी कुठली न ईलिक्षण कुठल राहतय लक्षात थोडा वेळ खाली बघितलं की आणि तिला बघाव वाटायच.मग मन काय माझ ऐकतयं हुई तवा. ईलिक्षण म्हणटल्यावर पूर्ण गावातलं वातावरण बदलत.या ईलिक्षणाचा परिणाम लहान मोठ्याच्यावर पण पडतो,निवडणूक आली की गावात एक वेगळं वारं वाहत असत.कारण काही दोन–वार निवडणुका पूर्ण जवळून अनुभवल्यात लहान नकळती मुल पण म्हणतात मी मोठ झाल्यावर हे होणार कारण निरागसच नी शेवटी फक्त ती पध्दतीच माहिती ईलिक्षण म्हटल्यावर दारूड्यांची दिवाळी फुकटची अन् दारू विकणाऱ्यांचा शिमगा हो. पैसा मिळवत्यात दारू दुकानदार. दारू पिणाऱ्यांचा रात्रभर कार्यक्रम सुरू होतात, कोण गटारीत पडलेला असतो अन् त्यांचे भजन सुरू होते. कोण त्याची पाटराखन करायला गटरी जवळ पडलेला असतो त्यांचा शिव्यांचा कार्यक्रम चालू असतो. मग कोणाला उकिरड्याकडेला शेणात ओव्या चालू असतात. मग कोण काय तर कोण माय?कोण पिऊन आपल्या उमेदवाराचा प्रचार करत असतो त्याला आचार संहिता माहित नसते की काय नाय?

आता या गावात स्टँडला लागूनच मराठी जिल्हा परिषद शाळा होती. अन् प्रत्येक गावात ईलिक्षण हे मराठी शाळेतच घेत असतात. मग इथ पण सुरू होते. मी आत काय नाय बघितलं पण बाहेर गेटजवळ १८ उमेदवार उभे होते म्हणून गावाची लोकसंख्या दहा हजारांच्या वर होती असे दोन्ही बाजूचे मिळून उमेदवार उभे होते.

फक्त हा एकच दिवस असा असतो की, त्याला कुठेच म्हणजे घरात देखील किंमत नसते पण निवडणुकीत उमेदवार त्याला फुल किंमत देतात.पहिल्यांदा त्याला हात मिळवणी करतात नंतर मध्यंतरी कधीही गाठ झाली तर हिंगलत पण नाहीत त्याला कुत्र्यापेक्षा कमी किंमत दिली जाते.याची त्या मतदाराला थोडीसुध्दा माहिती नसते.त्याला फक्त प्यायला मिळाली बस मग जीव द्यायला पण तयार झाला. हे नऊ उमेदवार व ते नऊ उमेदवार देखील पायात पांढरी पँट अंगात पांढरा नेहरू शेरवाण नीट्न डोक्याला सस याची केस लावल्या सारखी पांढरीशुभ्र व मऊ गादीसारखी टोपी घातलेली हातात मोबाईल जणु काय आता तीरच मारणार आहेत.अशा पोज मध्ये जणु त्या दिवशी लोकांची अशी काळजी घेत होते की दास असल्यासारखे.माझ्या डोक्यातुन पायापर्यंत सर्व गावाचा पण उमेदवाराचा इतका राग होता. पण मी त्या गावाचा नागरिक नव्हतो व तसे पण काय माझे चालण्या सारखे नव्हतेच.इकडे लोकांना सर्व सोई सुविधा दिल्या गेल्या होत्या ज्याला कधी

चांगल पाणी मिळालं नाही जेवणात पण आता त्याला प्यायला बिसलरीची बाटली देत होते.ज्याला कधी स्कारपिओ मारूती ,अल्टोला हात लावायला मिळत नव्हते ते त्यांना आज न्यायला आणायला,सोडायला स्कारपिओ गाडी स्पेशल होती. पण त्याला उद्याची काडीमात्र शंका माहीत नव्हती की,उदया मला कुत्र्याची किंमत मिळणार आहे. तरीही ते शहाणं थोड्यापुरत विचार करत नव्हत. उमेदवारांना वाटत होत की,जणु काय मी राजाच होणार पण त्यांना माहित नव्हते की, 'हर कुत्तेका दिन आता है.! हम तो इन्सान है!. ही भामटी चोरटे पणाने गळाला मासा लावत होते, आणि हे मासे जणू अक्कल नसल्यासारखी राहत होती की, जणू जेव्हा लहान मुल जन्म घेत व त्या बिचाऱ्याला माहित नसत की आपण या जगात कशाला आलोय हे त्याच ध्येय ठरलेल नसंत या मतदात्यांच होतं असच मला वाटलं कारण त्यांना उद्याची पर्वा नव्हती व मी का मतदान करतोय याचे भान नव्हते. या विचारातुन जरा बाहेर आलो की,माझी नजरा-नजर चालू होतीच व लोकांची गर्दी वाढत होती. काही मित्रांनी पण मला वेढल व मला वाटंल कॉलेजच ईच्यारत्याली पण नाही, जसे परिक्षेच्या रिजल्टच्या दिवशी कोण किती पास झालं या पेक्षा जास्त कोण नापस झाले हे विचारतो त्या पध्दतीने फक्त निवडणुक बद्दल विचारत होते पण मला हे सर्व एकुण वीट आला होता पण मी जाऊ शकत नव्हतो करण मनाला कोणी तरी आडवलं होत मग गेलो तर नजरेचे कनेक्शन तुटणार म्हणून तसाच उभा होता कोणी तत्ववत्ते आगोदरच अंदाज लावत होते की हे निवडून येणार ते येणार पण मत कोणाला दिलंय हे फक्त त्या मशिनला न त्या मत देणाऱ्याला माहीत होतं कोण म्हणे याने एवढे पैसे वाटलेत त्याने एकढे पैसे वाटलेत पण मी मनात म्हटले हे अठरापैकी कोणीच माणुसकी वाटली नाय वाटंल हे उमेदवारीच्या लायकीचे नाहीत. मी गावातील काही मित्राकडून उमेदवारांची पात्रता काढली तर खूप वाईट वाटले की काही उमेदवार अंगठेबहाद्दर होते व काही थोडे मराठी वाचणारे होते कुठेतरी तांदळात साळी काढावा तसा एखादा कुठेतरी दहावी शिकलेला बऱ्या पैकी हिंदी बोलता व इंग्रजी वाचता येणारी होती. मी गावामध्ये निरिक्षण कलं होत की घरातील अंगठेबहाद्दुर व्यक्तीला उमेदवारीला उभे करायचे व निवडणुक झाल्यावार सर्व कारभार हा घरातील दुसऱ्यानेच बघायचा अशा खुप उदाहरणे आहेत काही गावात तर अशी स्थिती आहे की आंधळ दळतय कुत्र पीठ खातंय..याच विचारात गुढुन गेलोलो असताना अचानक काही आवाज कानावर पडला की आज दिवसभर एस.टी.बस,वडाप गावातुन जाण्यास बंदी घातली आहे तरी सर्व लोकांनी बायपास रोड हायवेला जावे हे ऐकल्यानंतर खूप वाईट वाटलं की हा माणुस इतक्या वेळाने सांगतोय आगोदर सांगितल असते तर आता लेक्चर मध्ये असतो... लेक्चर चुकल्याच वाईट वाटत नव्हत पण त्या मतदारांच कारण त्या खुळसट लोकांना लालुच दाखविली जात होती. ती पण एक दिवसापुरती ते मतदार शहाणे विश्वास ठेवत होते.इकडे उमेदवारांची रसत्याने झुंबड लागलेली कोण काय-कोण काय म्हणत होते. बायकांच्या तोंडून शिव्या ऐकायला मिळत होत्या.अशा प्रकारे हे सोसायटीचे ईलिक्षण मोठ्या धुमधडाक्यात पार पडले.

# आधार..गरज की संस्कार

- सोनाली सुरेश देसावळे
बी.ए.भाग ३(इंग्रजी)

पात्र परिचय -

**१) चिन्मय -जेमतेम १२ वर्षाचा इ. ६ वीत शिकणारा मुलगा (नायक) .**

**२) प्रिया -चिन्मयची आई (मम्मा).**

**३) समीर - चिन्मयचे वडिल (डॅडा).**

**४) रमामावशी - चिन्मयच्या घरी काम व चिन्मयचा संभाळ करणारी बाई**

**५) मालती पाटील -चिन्मयची आजी**

**६) तात्यासाहेब पाटील - चिन्मयच आजोबा.**

(दृश्य क्रं १ समीरच्या घरी)

**चिन्मय** - मम्मा आज तु आणि डॅडा खरंच बाहेर जाणार आहात का? आज माझा हॉलीडे आहे, प्लीज थांबा ना घरी मला एकट्याला करमत नाही
गं प्लीज .....

**प्रिया** - एकटा कुठे आहेस बच्चा, रमामावशी येईलची इतक्यात, तीचं काम आवरली की ती थांबेल ना तुझ्या सोबत मग तू आणि ती दोघे मिळून गप्पा मारत बसा हवं तर ते अल्बम बघा दोघे मिळून.

**चिन्मय** - नको गं ! कंटाळा येईल,थांब ना एक दिवस माझ्यासाठी

**प्रिया**- थांबले असते,नक्कीच पण आज खुप इंर्पोटंट मिटिंग आहे ना?सॉरी.... आज फक्त मॅनेज कर नेक्स्ट हॉलीडेला मी,तु आणि डॅडा नक्की फिरायला जाऊ हं..........सॉरी

**चिन्मय** - बघ ! प्रमीस

प्रिया - पक्का प्रामिस(दरवाजाची बेल वाजते,प्रिया रूममधून)समीर बघ रे जरा,मी चिनूचे कपडे नीट लावतेय.

**समीर** -हो...हो बघतो (दरवाजा उघडतो) रमामावशी या या अग ! रमामावशी आल्या,त्या लावतील कपडे, तू चल मला तुला ड्रॉप करून पुढे मिटींग अटेंड करायची आहे.चल लवकर

**रमामावशी** - हो.. हो बाईसाहेब जा,मी आवरते इतक्यात सगळं आणि आज चिनूला सुट्टी आहे नां मग आम्ही दुपारी पार्कात जाईन खेळायला काय चिनू जायचे का नाय ?

**चिन्मय** - हे...आज मज्जाच मज्जा पण अगोदर अल्बम बघू नंतर जावू चालेल ?

रमामावशी - हो तर चालेल की...

**प्रिया** -बरं मी निघते किचन नीट आवरून घ्या, चिनू साठी जेवण बनवा,नाष्टा केलाय त्याने,आम्हाला यायला उशीर होईल चिनूची काळजी घ्या.चल समीर मी गाडीजवळ वाट बघते.

**समीर** - हो चल.बाय चिनू,टेक केअर बाहेर जाताना दरवाजा नीट लावा रमामावशी चल, बाय चिनू.

**चिन्मय** -बाय डॅडा,बाय मॉम रमामावशी - चल आता पहिले तुझी रूम आवरते,चल,चल पार्कात जायचंय की नाय चल लवकर (चिन्मयच्या रूममध्ये)

काय रे पसारा,आज उठल्यापास्न नुसत फोटो बघतुयास काय? आणि आंघोळ-पाणी तर आवरलस का नायस?

**चिन्मय** – अग आंघोळ केली,नाष्टा केला आणि नंतर हे फोटो फक्त बघायला घेणार इतक्यात तू आलीस आणि मम्मा – डॅडा गेले चल आता अल्बम बघूयात आपण दोघे

**रमामावशी** – मी काम करत करत बघते तू सांग कि मला काय बघतुयस ते चाललं (रमामावशी कामाला लागते,मध्येच चिनू सोबत फोटो बघते आणि त्याला पाहुण्यांची ओळख सांगते)

**चिन्मय** – हा बघ माझा पहिला वाढदिवस, मी केवढा छोटुकला आहे.हा डॅडा,ही मम्मा, हा मामा आणि..... हे गं कोण? मला मम्मा म्हणते हे माझे आजी-आजोबा पण हे फार दूरच्या गावी असतात खरंच का गं किती दूर आहे यांच गाव,मला भेटायच त्यांना,तुला माहीतीय ते गांव ?

**रमामावशी** – हो बाळ तुझे आजी-आजोबा खुप चांगली माणसं हायती प्रेमळ,दयाळु आणि साधी मी मोलकरीण असून सुध्दा मला मुलीवानी वागवायचे, आई तर कामात हातभार लावायच्या त्यांचा स्वभाव पण लय भारी,अगदी साधी भोळी माणसं ती (रमामावशीचे डोळे पाणावले,तीचा शब्द घशातच अडकला.)

**चिन्मय** – मग ते कोठे आहेत आत्ता? त्यांच्या गावाला फोन नाही का ?ट्रेन जात नाही का? आपण ममा डॅडा ला घेवून जाऊया ? तु सांग मम्माला ती ऐकेल तुझं आपण जाऊ सगळे तिकडे

रमामावशी – हो जावूया की पण ते आता आपल्या जवळ असून बी फार लांब गेल्यात...

**चिन्मय** – म्हणजे कुठे गं ?

**रमामावशी** – तुझ्या मम्मा आणि डॅडानं त्यांना आश्रमात ठेवलय कायमचं त्यांचा लई तरास होतो नव्हं तुझ्या मम्माला म्हणून

**चिन्मय**– आश्रमात म्हणजे कोठे ? हे कोणत्या गावाचे नांव आहे ?

**रमामावशी** – हे एक परकारचं गावचं हाय, त्या लाचार आई-बांच ज्यांच वझं होत त्यांच्याच पोरांस्नी आणि ते गांव हीत जवळचं हाय मार्केट शेजारी पर गाव निस्त जवळ हाय मनं पार दूर झाल्यात बघ समद्यांची,तिथ असले त्यांना कुणी सांबाळ करणारे नाहीत अशी समदी लोक एकत्रीत त्यात.

**चिन्मय** – हा म्हणजे अनाथ आश्रम परवाच मराठीच्या मिसनी आम्हाला एका आश्रमाला भेट देण्यासाठी नेले होते.आमची जुनी कपडे,चपला,पुस्तके देण्यासाठी ,आम्ही त्या लहान आई-वडिल नसलेल्या मुलांना दिली खुप छान होती ती मुले पण मला तेथे फक्त मुलेच भेटली आजी-आजोबा नाही भेटले,कोठे गेले होते का बाहेर ?

**रमामावशी** – तु पाहिलेली मुलं जशी आई वडिलांविना पोरकी होती आणि त्यांना त्या आश्रमात रहांव लागलं तस तुझ्या आजी-आजोबांच्यावानी लई आजी-आजोबा मुलाबाळां वाचून पोरके असतात आणि ते बी एका आश्रमात राहतात "वृध्दाश्रमात" ते वृध्दाश्रम जवळंच हाय भाजी मार्केट शेजारी,मी भाजी आणायला गेल्यावर भेटते त्यांना ते तुझी चौकशी करतात तुझ्या वाढदिवसाला मी जो शेटर (स्वेटर) तुला दिला होता ना त्यांनी तुझ्यासाठी, त्यांचा लई

जीव हाय तुझ्यावर आणि मालकांवरबी

**चिन्मय** – मग, मला पण ने ना एकदा भेटायला मला पहायचंय त्यांना,त्यांच्या मांडीवर झोपायच छान–छान गोष्टी ऐकायच्यात,खूप खेळायंचय,नेशील मला? मी मम्मा–डॅडाची परमिशन घेईन.

**रमामावशी** – नको, त्यांना अजिबात सांगू नको त्येनला नाही आवडणार त्ये तुला रागावतील आणि मला कामावरन काढतील,तु त्येनला कायच सांगू नको.

**चिन्मय** – बंर नाही सांगणार पण एका अटीवर,तु मला पार्क ऐवजी त्यांच्याकडे घेऊन जाशील. (रमामावशी गोंधळात पडते इकडे आड तिकडे विहिर अशी अवस्था होते)

**रमामावशी** – बरं चालतंय पण आपण गेलतो हे कुणालाच कळू द्यायंच नाही तुझ्या मम्माला सुध्दा तरच जायचं आपण

**चिन्मय** – हो प्रॉमिस मी कोणालाही सांगणार नाही चल आलोच फ्रीज मधली चॉकलेट घेतो त्यांच्यासाठी

**रमामावशी** – हो चल,पण जेवणार कवा, भूक नाय का लागली.

**चिन्मय** – टिफिन भर माझा, आपण तिथेच जेवण करू,चल लवकर मम्मा यायच्या अगोदर आल पाहिजे चल पटकन

**रमामावशी** – अरे थांब की,डबा तर घेऊ का नको,घर बंद करायला पाहिजे आणि मालकिण बाईंना फोन कर की आमी पार्कात जातोय,जेवण तिथंच करणार म्हणून

**चिन्मय** – केला,हा काय तिलाच फोन लावला होता इतक्यात, तू चल

**(दृश्य क्रं – २ वृध्दाश्रम)**

**चिन्मय** – बापरे केवढ जवळ आहे हे आपण इतक्यात पोहोचलो सुध्दा रमामावशी कुठं आहेत गं आजी–आजोबा मला त्यांना कधी भेटतोय आणि त्यांना सरप्राईज देतोय असं झालंय

**रमामावशी** – थांब त्या टेबलावर बाई आहेत ना त्यांना त्येंच नांव सांगायच,मग त्या बोलावत्यात त्यांस्नीं चल.

**कर्मचारी** – बोला कोणाला भेटायच,काय काम आहे.

**रमामावशी** – तात्यासाहेब पाटील आणि मालतीताई पाटील यांना भेटायंच त्यांचा नातू हा चिनू ,चिन्मय पाटील त्येला भेटायंच बोलावताय का त्येनला.

**कर्मचारी** – हो हो बसा इथे मी पाठवतो त्यांना,

**चिन्मय** – मला ओळखणार कसे माझे आजी–आजोबा,आणि मी कसा ओळखणार त्यांना?

**रमामावशी** – अरे ते आजी–आजोबा हायती तुझं, तुला लगेच वळकतील आणि मी परवा आले तवा तुझ्या पाचवीच्या गॅदरींगचा फोटो दिलाय त्येंनला,आणि न्हाईला प्रश्न तुझा तुझे आजोबा दिसायला मालकावानी रूबाबदार,काळाकोट , डोक्यावर टोपी,तीन बटनाचा सदरा, कपाळावर गंध आणि डोळ्यात प्रेम,अनं आजी दिसायला साधीबाधी कपाळावर ठसठशीत कुंकू आणि ओठावर सदा हसू अशी हाय पर दोघबी आता पार थकल्यात वयानबी आणि मनानबी. (इतक्यात चिन्मयला मागून अचानक कोणाचातरी स्पर्श होतो.)

**आजी** – चिनू,माझा चिनू म्हणत त्याला मिठी मारते,आणि घळाघळा रडायला लागते

**आजोबा** – आता काय म्हणायंच ह्या खुळ्यापनाला,

आजपर्यंत नातवाला बघायला मिळत नाही म्हणून रडत हुतासा आणि आता नातू स्वत:हून बघायला आला तरीपण रडतायसा अवं त्याला डोळभरून बघा तरी, रमाबाई खरंच लई उपकार झालेत बघ आमची एवढ्या वर्षाची इच्छा तु पर्ण केलीस पोरी आता आमी भरून पावलो.तुला द्यायला आमच्याकडे काय नाय पर आशीर्वाद सदैव आहेत पाठीवर तुझ्या.

**रमामावशी** – ल्येक बी म्हणताय आणि उपकाराची भाषा करताय ल्येक उपकार नाय करतीव्य पूर्ण करते समजलं का ?

**चिन्मय**–आजी–आजोबांनी तुमच्यासाठी काय आणलय ओळखा पाहू ? छान सरप्राईज आहे,चला आपण त्या झाडाखाली बसू आणि पाहू.

**आजी** – काय रे आणलस,आम्हाला नाही ओळखता येत तुच सांग बर

**चिन्मय** – बॅगेतून चॉकलेट काढतो आणि म्हणतो बघा किती गोड सरप्राईज आहे.

**आजोबा** – अरे वा इतक मोठ सरप्राईज छान छान आज आम्हाला आमच्या नातवामुळे पुन्हा एकदा चॉकलेट खाण्याचा योग आला.

**आजी** – आजोबा सावकाश हं तुम्ही पुन्हा तरूण झालात पण कवळी म्हातारींच आहे हो.काय ग रमा खराय की नाही ? (सगळे खूप हसतात.)

**रमामावशी** – हो तर,तर चिन्मयने जेवण आणलंय आपण सगळे जेवण करूया चला लवकर

**आजोबा** – बापरे आमचा नातू बराच तयारीने आलाय (इतक्यात सानेकाकू शेजारून जाताना त्यांचा संवाद ऐकतात)

**साने काकू** – काय आज पाटील फॅमिली खुप आनंदात वाटते,नातू आलाय ना भेटायला मज्जाच आहे मग आज, चला आज आम्हाला एकट्याला जेवावं लागणार असं वाटतयं

**आजोबा** – हो हो, हा आमचा नातू चिन्मय सहावीत शिकतो खूप हुशार आणि प्रेमळ आहे अगदी सम्या सारखा (आजोबा अचानक थांबतात)

**साने काकू** – चला पाटील वहीनी निघते,जेवण करायचय ना.(सगळे मिळून जेवण करतात)

**चिन्मय** – आजोबा तुम्ही दोघे आपल्या घरी चला आपण सगळे एकत्रच राहू ,तुम्ही,आजी मी,मम्मा–डॅडा मग आपण रोजंच एकत्र जेवण करू,तुम्ही मला छान–छान गोष्टी सांगा आणि रमामावशी आपल्याला हॉलीडेला पार्कमध्ये घेऊन जाईल हो ना ग रमामावशी

**रमामावशी** – चालल की, पर तुझ्या मम्मा–डॅडाला चालायंच नाय ते त्यास्नी असली जुनी माणसं नायत आवडत.

**आजी** – जाऊ दे ग रमा,हे बघ चिन्मय त्यापेक्षा आपण असं करू तुच रमामावशीला घेऊन येत जा आम्हाला भेटायला आणि चॉकलेट आणायला विसरायचं नाही हं

**चिन्मय** – नको मी समजावेन त्यांना ते ऐकतील माझं,तुम्ही कसं तुमच्या मुलाचं ऐकलं आणि इथे राहायला आला मग तेही त्यांच्या मुलाच नक्की ऐकतील

**रमामावशी** – देवच पावल असं झाल तर,बरं आता आमाला निघायला हवं मालकीन बाई घरी यायची वेळ झाली चल चिनू आपण पूना आणि येवू की इंथ.

**चिन्मय** – थांब ना गं,जराच वेळ अजून एक गोष्ट ऐकू आणि मला खूप गप्पा मारायच्या आहेत.

**आजोबा** – हे बघ बाळा पुढल्यावेळेस आलास की मी तुला दोन गोष्टी सांगेन आणि झोपाळ्यावर खेळायला नेईन आता जा आई–बाबा घरी आले असतील,शाहना बाळ माझा.

**आजी** – पुढच्या वेळेस येशील तेंव्हा माझ्यासाठी एक छानसा आपला सगळ्यांचा फोटो घेऊन येतोस काय रे ?

**चिन्मय** – तुम्ही आता माझ्याबरोबर घरी येणार आहात आणि नसेल तर मला येवून घ्या तुमच्यासोबत, मला माझे आजी–आजोबा माझ्या सोबत हवे आहेत घरी किंवा इथे (काही तरी विचार करतो आणि चौकशी टेबलाकडे पळत जातो.)

**रमामावशी** – चिनू....... थांब, थांब (सगळे चिनूकडे पळत जातात)

**चिन्मय**– मी जरा हा फोन वापरू शकतो का प्लीज

**कर्मचारी** – हो पण जास्त वेळ नाही

**चिन्मय** – थ्यँक्यू, नंबर डायल करतो फोनची रिंग वाजते हॅलो,हॅलो डॅडा मी चिन्मय बोलतोय.

**समीर** – फोनवरून हां बोल बच्चा,तु कुठे आहेस आणि घरी कधी येतोस रमामावशी सोबत आहे का ? आम्ही वाट पाहतोय या आता पार्कमधून घरी.

**चिन्मय** – हो डॅडा पण मम्मा कुठे आहे तीला दे ना मला बोलायचंय

**समीर** – (काळजीच्या स्वरात) प्रिया चिनूला काहीतरी बोलायचय तुझ्याशी

**प्रिया** – स्पीकरवर टाक ना मी कॉफी बनवतेय.

**समीर** –हां चिनू थांब हं मम्मा बालतेय

**प्रिया** – बोल बच्चा कुठे आहेस ? वाजले किती ,घरी कधी येतोस मी कधीची वाट बघतीय

**चिन्मय** – हां मम्मा तु मला सांगायचीस ना आपले आजी–आजोबा खूप दूरच्या गावी आहेत ते गाव मला सापडलय "आधार वृध्दाश्रम" असं नाव आहे त्या गावचं आणि माझे आजी–आजोबा सुध्दा सापडले आणि मी त्यांना आता घरी घेऊन येतोय खूप दूरच्या गावाहून येतोय आणि जेवण बनवायला विसरू नको,ठेवतो फोन बाय. (आजी–आजोबा,रमामावशी एकटे चिनूकडे बघत असतात)

(समीरच्या हृदयाचा ठोका अचानक चूकतो आणि त्याला चिन्मयचा अभिमान वाटतो मुलगा म्हणून नव्हे तर तात्या साहेब पाटलांचा नातू म्हणून)

---

## माणसे अशी का वागतात?

माणसे अशी का वागतात
कळत नाही रे मला केवळ एका चुकेसाठी
दोष देतात आयुष्याला चौऱ्याएंशी लक्ष योनीतुन
मानव जन्म येतो एकदा छोटया छोट्या चुकांसाठी
दोष देती आयुष्या अनेकदा विचार आणि बुध्दी
सारे भगवंताने मानवा बहाल केले
त्या सर्वच सुंदरतेचे मानवा तू नुकसान केले
जन रडतील तुझ्यासाठी क्षणैक आणि पळभर
तू मात्र भोगणार तुझेच दुःख आयुष्यभर

मयुरी तानाजी घनवट
बी.ए. भाग–१

# जैव विविधता आणि तिचे संवर्धन

-सोनाली आदिक हवालदार
एम.कॉम, भाग-१

माणसाच्या सभोवताली असणाऱ्या वनस्पती व प्राणी यांना सजीव असे म्हणतात.
प्रत्येक सजीवाला विशिष्ट रचना व कार्य पद्धती असते. हालचाल, चयापचय, प्रजननक्षमता इ. गुणधर्मामुळेच सजीव निर्जिवांपेक्षा वेगळे आहेत. सजीवांचे मुख्यत्वे तीन प्रकार आढळतात
१.वनस्पती,
२.पाणी
३.सुक्ष्मजीव
पर्यावरणाचा विचार करता.मानवाच्या सभोवताली वेगवेगळ्या प्रकारच्या सजीवांचे अस्तित्व ताणवते त्यात वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती, निरनिराळे प्राणी आणि अनेक प्रकारचे सुक्ष्मजीव दिसून येतात.एका विशिष्ट वातावरणात वेगवेगळ्या प्रकारचे आणि वेगळ्या संख्येच्या सजीवांचां एकत्रित अधिवास म्हणजे जैवविविधता होय.

जैवविविधता हे नैसर्गिक संसाधन आहे. निसर्गाने मानवाला दिलेल्या अनेक देणग्यांपैकी एक असून मानवी जीवन सुखकर करण्यासाठी महत्वाच्या घटक आहे. मानवाच्या अस्तित्वासाठी प्रमुख घटक असणारी जैवविविधता आर्थिक प्रगतीचा मार्गही आहे.निसर्गात निरनिराळ्या प्रकारचे सजीव आढळतात.त्याचा आकार,प्रकार,संरचना वेगवेगळ्या प्रकारची भिन्नता आढळते,तरीही ते एकाच छत्राखाली कार्यरत राहतात.वेगवेगळ्या प्रकारचे जगभरात २० लाखाहून अधिक सजीव आढळतात,त्यात झाडांच्या वेगवेगळ्या जाती, वेगवेगळे प्रकार आहेत.तर प्राणाही अनेक जातींचे आहेत.सर्व ग्रहांमध्ये पृथ्वी हा एकमेव सजीव ग्रह आहे.पृथ्वीवरील अनुकूल वातावरण आणि पाण्याचा उपलब्धते मुळे वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधता उद्यास आली आहे.येथे सजीवांच्या आणि वनस्पतीं च्या वैविध्यपूर्ण जाती आढळतात. मानवाची जडण -घडण याच जैवविविधेतेवर अवलंबुन आहे, मानवाच्या उत्क्रांतीच्या अगोदर पासून पृथ्वीवर परिपूर्ण अशी जैवविविधता ही अजून अस्तित्वात आहे. शास्त्रज्ञांच्या मते, पृथ्वी वर साडेतीन कोटी सजीवांच्या जाती अस्तित्वात आहेत. त्यापैकी आपणास केवळ कोणत्याही भूभागात एकाच प्रकारच्या वनस्पती व प्राणी आढळत नाहीत. जैवविविधता म्हणजे विविध प्राणी,वनस्पती व सुक्ष्म प्राणी व वनस्पती यांचा अभ्यास वरील सर्वांचे संरक्षण हे परिस्थिती साठी उपयोगी आहे. या सर्वांतूनच पर्यावरणीय स्थिरता येते. जग- भरातील जैवविविधतेचा अजून अभ्यास झालेला नाही आणखी कित्येक प्राणी,वनस्पती व सुक्ष्म जीवांची साधी माहितीही मिळविता आली नाही. पृथवीवर ३० ते ४० कोटी किटक असतील त्यातील एखादा कोटी किटक आपल्याला माहित आहेत.

भारत हा देश जैवविविधता असलेला १२ केंद्रापैकी एक म्हणून ओळखला जातो. भारताच्या जैविक संपत्तीमध्ये ४५,००० झाडे आणि ६५,००० प्राणी प्रजातींच्या समावेश होतो. भारतात भरपूर प्रकारच्या रानटी प्रजाती,प्राणी आणि वनस्पती आढळतात.अन्न पूरविणाऱ्या विविध प्रकारच्या वनस्पती भारतात आढळतात. त्यामध्ये डाळी, द्विदलीय वनस्पती, पालेभाजी,फळभाजी, तेलबिया, इ.आढळतात.त्यामध्येच वनस्पती जैवविविधतेच्या प्रमुख घटकांपैकी एक आहेत. वनस्पतींचे जागतिक वितरण विषम आहे. एवढेच नव्हे तर भारतात देखील विषम वितरण आहे. कन्याकुमारी पासून ते काश्मीर पर्यंत प्राणी आणि वनस्पती यांच्यात खूप विविधता आढळते. म्हणूनच तर भारतास बहू जैवविविधता असलेले राष्ट्र म्हणतात.

प्राचीन काळापासून भारतात शेती व्यवसाय चालतो. प्राचीन काळापासून आजच्या काळापर्यंत शेतीव्यवसायात अनेक परिवर्तन आली. कमी वेळात जास्त उत्पन्न देणाऱ्या विविध पिकांच्या जाती या शेतीमध्ये उपयोगात आणल्या जाऊ लागल्या आणि उत्पादनातही भरपूर वाढ झाली आणि त्याचा फायदा वाढत्या लोकसंख्येला झाला.रोग प्रतिकारक शक्ती असणाऱ्या पिकांच्या जाती लागवडीसाठी उपयोगात आणणे.पंधरा हजार वर्षापूर्वी भातशेतीची सुरूवात भारतातील हिमालयातील टेकड्यांच्या उतारावर झाली. भारत हा त्याच्या इतिहास,भूगोल आणि संस्कृतीने ओळखला जातो,इतिहास ,भूगोलात आणि संस्कृती मध्ये जसे वैविध्य आढळते.त्याचप्रमाणे भारतात जैवविविधते मध्येही बहू–विविधता आढळते.नैसर्गिक परिसंस्था विविधतेले नटलेल्या आहेत.भारतातील सदाहरित जंगले अंदबार निकोबार मधील जंगले पश्चिम घाट,पुर्वोत्तर भागातील पुर्वोत्तर पठारी प्रदेशात अर्ध सदाहरित जंगलेही आहेत.मान्सून जंगले,काटेरी जंगले,पाईनची जंगले, व इतर शुष्क वाळवंट प्रदेश इ. विविध प्रकारचे वनस्पतींचे वितरण भारतात आढळते. मानवी हस्तक्षेपामुळे सदाहरित जंगलांचे रूपांतरण अर्धसदाहरित जंगलामध्येही होत आहे. प्राणी वनस्पती जीवनावर त्याच्या परिणाम स्पष्टपणे दिसत आहे.अंदमार व निकोबारमध्ये सदाहरित जंगले आहेत.उष्णकटिबंधीय जंगले असलेल्या पुर्वोत्तर भारतामध्ये म्हणजेच आसाम, नागालँड,मणीपुर,मिझोरम,त्रिपुरा,मेघालय, अरूणाचल प्रदेशाचा पठारी प्रदेश यामध्ये सदाहरित व अर्ध– सदाहरित जंगले आढळतात.

भारत देशातील प्राणी वनस्पती जीवन विविधतेने परिपूर्ण आहेत. यात ७५,००० झाडांच्या ज्ञात जाती आहेत. अज्ञात झाडांच्या जातींची नोंदही नाही.२००० गोड्या व खऱ्या पाण्यातील माशांच्या जाती आहेत. पक्षी ७२००० जातींसह आहेत. त्यांना साथसगंत सस्तन, सरपटणारे,उभयचर प्राणी, किटके,व कृमीची आहे,शेतातील विविधता ही दिवसेंदिवस वाढत आहे. अधिकाधिक उत्पादन कमीत कमी जागेत व कमीत कमी वेळेत घेण्याची स्पर्धा आज लागली आहे, जैवविविधतेचा उत्पादनवाढी साठी वापर करून घेण्यात येत आहे. कृषी क्षेत्रात रासायनिक खते व किटकनाशके यांच्या वापराने उत्पादन वाढ दिसून येत आहे.

आपले कृषी व्यवस्थापन सुक्ष्मजीवांवर

अवलंबून आहे. सुक्ष्मजीव हे कृषी उत्पादनावर परिणाम करतात राष्ट्रीय उत्पादनावरही त्याचा परिणाम होतो.वनस्पतीतील विविधता आज नष्ट होत आहे. त्याला पुढील प्रमाणे कारणे आहेत परजिवी प्राणी व वनस्पती, वनस्पतींचे परागीकरण. वनस्पती वरील रोग इ. आहेत. प्रदूषणामुळेही वनस्पतींतील रोग प्रतिकारक शक्ती हळूहळू कमी होत असलेली दिसून येते.जमिनीच्या धूप होण्याने जंगले नष्ट होत आहेत.त्यामुळे वनपस्पतीतील विविधता धोक्यात आलेली आहे.

अनुवंशशास्त्रातील प्रयोगामुळे व झालेल्या प्रगतीमुळे जुन्या वनस्पतीतील जातींचे संवर्धन करण्यास येत आहे. जुन्या जातींच्या वनस्पतीतील काही गुणांचे संक्रमण पुढच्या पिढीत आणून त्या वनस्पतींचे जतन व रक्षण करण्यात येत आहे. अशा अनेक विविध वनस्पतींतील उत्पादकता कायम राखण्यात येत आहे. जुन्या पिढीतील गुणांचे कायम ठेवणे हे अनुवंश शास्त्राचे काम नवीन तंत्रज्ञानाद्वारे करण्यात येत आहे. हे तंत्रज्ञान पिकांच्या काही बाबतीत करण्यात येत आहे. .

उदा-भुईमुग,बटाटा वांगी,कापुस

**जैवविविधतेचे संवर्धन-**

मानवी लोकसख्येतील वाढ व विज्ञान तंत्रज्ञाना तील प्रगती यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर यातून अनेक प्रश्न निर्माण झाले हे प्रश्न पुढील प्रमाणे सोडवता येतील .

सध्याच्या परिस्थितीत लोक संख्येच्या उद्रकामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर मात करताना झालेल्या अनेक मानवी क्रिया जैवविविधते च्या ऱ्हासास कारणीभूत ठरलेल्या दिसतात. जैवविविधता विकसीत होण्यासाठी लाखो वर्षे लागतात. परंतु आजमितीला रासायनिक ,भौतिक व वातावरणीय प्रदुषणामुळे अनेक जाती नष्ट होऊ लागल्या आहेत. म्हणजेच सजीवाच्या प्रजाती निर्मिती व वाढीचा दर वाढविला पाहिजे .

मूलस्थानी संरक्षण पद्धती मध्ये सजीवांच्या मुळ स्थानावर अर्थात,नैसर्गिक अधिवास अर्थात संरक्षण केले जाते. म्हणजेच वनस्पतींना जंगलामध्ये सरंक्षित केले जाते.अभयारण्यांची निर्मिती करून त्यात विशेष जातींना सरंक्षण दिले जाते, त्याठिकाणी त्या प्रजातींच्या वास्तव्यामुळेच प्रजननाद्वारे नवीन जीवांची निर्मीती होते व त्या सजिवांच्या संख्येत वाढ होते व जैविविधताही कायम राखण्यास मदत होते.

परस्थानी सरंक्षण या दुसऱ्या पदध्दतीमध्ये जैवविविधतेचे संवर्धन करताना सजीवांना मुळ स्थानापासून किंवा नैसर्गिक अधिवासापासून दूर म्हणजेच नव्याने तयार केलेल्या कृत्रिम जागेवर आणले जाते. जैविक उद्याने,वनस्पतीक उद्याने ,हरितगृहे,प्रयोगशाळा, जीनबँका इ. ची निर्मिती ही त्याचीच उदाहरणे आहेत. या ठिकाणी वेगवेगळे प्रयोग करून सजीव प्रजातींचे सरंक्षण करण्याचे प्रयत्न कले जातात. परंतू या पद्धतीत मात्र सजीव आपला नैसर्गिक अधिवास हरवून बसतात.नवीन प्रकारच्या कृत्रिम वातावरणात वेगवेगळ्या दुर्मिळ सजीवांचे सरंक्षण संगोपन ,वाढ प्रजनन,इ. बाबी या पद्धतीत शक्य होतात .वरील दोन्ही प्रकारा पैकी कोणत्याही प्रकारे सजींवांचे सरंक्षण केल्यास,जैवविविधतेचे संवर्धन करणे सहज शक्य आहे. .

# जीवनातील परिक्रमा

-तृप्ती सुरेश काटकर
एम.ए-भाग-२ (मराठी)

"सुखाबरोबर वाट येते दुःखाची
असे जीवनाचे सुत्र
दुःखची रग पोहचता देहाला
मिळे मानवास शहाणपणाचा मंत्र
थोडे सुख,मोठे दुःख तयाची
मानव जीवनास लागे महासत्र"

दुःख-दुःख ही दोन अक्षरे सुध्दा विसर्गाने वेगळे होऊनी सुध्दा ती दोन अक्षरे एकत्र नांदतात आयुष्यात दुःखाची परिसीमा सांगावी तेवढी कमीच आहे. म्हणूनच समाजातील बुरसटलेल्या विचारांचा वाहणारा गाळ दूर करणारे, श्रीमंत घराण्यात जन्मलेले समाजातील दुःखितांवर आपल्या सुमधुर अंभंगांनी थोडेसा सुखाचा पाझर घालणारे,संसारिकांनी सुख-दुःखाचा पाढा समजून देणारे,गरिबांचा वाली विठ्ठलावर आईचा लेकरू म्हणून दुःखाची मागणी घालणारे आपले संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात.

" सुख पहावे जवापाडे
दुःख पाहता पर्वताऐवढे "

असे विचार करता आयुष्यात सुख-दुःखाला पर्याय नाही. सुखा मागूनी येती दुःख आणि अखंड दुःखा मागूनी येती सुख.असे म्हणावे लागलेच. आनंद,राग,लोभ,दया,करूणा, हे सर्व मानवाच्या जीवनाला चिकटलेल आहेत कधी आनंद कधी राग,कधी अधिक लोभ, माणसामध्ये असतोच त्यातूनच मानवाला जीवनात शहाणपणाचे डोस आपोआप मिळत जातात.जगामध्ये काय कमी सुख आहेत? की कमी दूःखे आहेत? पाठशिवणी प्रमाणे सुखाने जरी कितीही आडवळणे घेऊन स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न केला तरी सुखाला दुःखाची साथ करावी लगतेच त्याशिवाय जीवनात सुख-दुःखाला महत्व प्राप्त होत नाही.जन्मापासून ईश्वराने प्रत्येक मानव जातीला प्रारंभीपासून कोणती ना कोणती सुख -दुःखाची देणगी दिली आहे. एखादे मुल जन्म घेतानासुध्दा रडत-रडत जन्म घेते तेथेही त्याच्या वाट्याला दुःख असते आणि पुन्हा ते अनंत यातनेतून जन्माला येते परंतू त्याचक्षणी थोड्याशा सेकंदात ते जगात डोळे उघडल्या नंतर हसत मुखाने येत असते.एक उदाहरण पहा... जोंधळा,गहू,तांदूळ, हरभरा अशा कडधान्यांनी भरल्या घरात एखादी स्त्री आपल्या मुखातून ओवी गात जात्यावर जोंधळे दळत असते. जात्याच्या शेजारी सुपात जोंधळे असतात पण ते मात्र धाय मोकलून रडत असतात, का तर जमिनीतून वर डोकावून जन्म घेतलेल्या त्या जोंधळ्याला वरून सूर्य वर वारा यांनी मायेंनी गोंजारून मोठे केलेले असते वाढवलेले असते जन्म घेताच मायेच्या छायेखाली आनंदाने वाऱ्याच्या झोतात डुलत झुलत आनंदाची गाणे गातच ती मोठी होतात. परंतू त्यांना माहिती नसते की पुढे भविष्यात आपणाला

